कृषीवल
रायगड, बुधवार, दि. १० एप्रिल २०२४
किंमत ४ ₹

## विरारमध्ये चार कामगारांचा मृत्यू

**विरार :** विरारमध्ये एका खासगी सांडपाणी प्रकल्पात साफसफाई करण्यासाठी उतरलेल्या चार मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला आहे. ऐन गुढीपाढव्याच्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडल्याने विरारमध्ये शोककळा पसरली आहे. मंगळवारी (दि.९) सकाळी साडेअकराच्या सुमारास विरारच्या ग्लोबल सिटी येथे रुस्तमजी शाळेच्या बाजूच्या एसटीपी प्लांटमध्ये खासगी कंपनीचे तीन मजूर एसटीपी प्लांट चोकअप असल्याने उतरले होते. त्याचवेळी एक मजूर प्लांटमध्ये पडला. त्याला वाचवण्यासाठी दोन मजूर उतरले ते वर न आल्याने एक खासगी मजूरही त्यात उतरला आणि दुर्दैवाने यात पान २ वर

## मनसेचा महायुतीला बिनशर्त पाठिंबा

**राज ठाकरेंची भूमिका**

**मुंबई :** मनसे लोकसभेची निवडणूक लढणार नाही, मात्र मोदींना प्रधानमंत्री करण्यासाठी महाराष्ट्रात महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याची राजकीय भूमिका मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी स्पष्ट केली. मनसेच्या कार्यकर्त्यांनी विधानसभेच्या निवडणुकीच्या कामाला लागा, असे आदेशदेखील त्यांनी देत विधानसभा लढणार असल्याचे संकेत दिले. राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्याने इंडिया आघाडीसाठी हा फार मोठा धक्का असल्याचे बोलले जाते.गुढीपाडव्यानिमित्त मुंबई येथील शिवाजी पार्कवर मंगळवारी मनसेचा जाहीर मेळावा पार पडला. पान २ वर




# मतदान केंद्रावर 'महिलाराज'

सुयोग आंग्रे
। रायगड ।

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी प्रत्येक मतदारसंघात महिलांसाठी विशेष मतदान केंद्र असणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्याचे आदेश दिले असून राज्यात यावेळी ४०० मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत. यासाठी रायगड जिल्ह्यातील मावळ आणि रायगड लोकसभा मतदारसंघातील सात मतदान केंद्रांवर महिलाराज असणार आहे. पनवेल, कर्जत, उरण, पेण, अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड या विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी एक महिला नियंत्रित मतदान केंद्र उभारण्यात येणार आहे.

**लोकसभेसाठी सात मतदान केंद्रांची निवड**

**रायगडसाठी चार तर मावळसाठी तीन महिला नियंत्रित मतदान केंद्र**




> रायगड जिल्ह्यातील महिला नियंत्रित मतदान केंद्रांबरोबरच तरुण मतदार असणाऱ्या मतदान केंद्रांवर तरुण अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येणार आहे. युवा नियंत्रित मतदान केंद्रदेखील सात असणार आहेत. दिव्यांग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक तैनात असणारे सात मतदान केंद्र असणार आहेत. त्याचबरोबर रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघामध्ये सात युनिक मतदान केंद्रदेखील तयार करण्यात येणार आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर पाच अधिकारी आणि कर्मचारी असे पथक तैनात केले जाणार आहे.
>
> –स्नेहा उबाळे, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी

भारतीय लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणून लोकसभा निवडणुकीकडे पाहिले जाते. या १५ दिवसात हा उत्सव साजरा करण्यात राजकीय पक्ष कसलीच कसर ठेवत नाही. मात्र या उत्सवावर पूर्ण नियंत्रण ठेवण्याचे काम निवडणूक आयोग करीत असतो. अमर्याद अधिकार राखून असलेल्या आयोगाचे अधिकारी प्रत्येक बाबीवर निगराणी ठेवतानाच अभिनव उपक्रम पण राबवून लक्ष वेधून घेतात. रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक अंमलबजावणीचा आराखडा तयार करताना महिलांना अग्रभागी ठेवत एक उपक्रम आणला आहे. पान २ वर

# 'मविआ'चं ठरलं




**■ ठाकरे गटाला २१ जागा, काँग्रेस १७, पवार गटाला १० जागा**

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा अंतिम फॉर्म्युला गुढीपाडव्याच्या शुभदिनी मंगळवारी (दि.९) ठरला. मुंबईत महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शरद पवार, जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, संजय राऊत उपस्थित होते.

महाविकास आघाडीने २१-१७-१० असा जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला आहे. यामध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाला २१ जागा, काँग्रेसला १७ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला १० जागा देण्यात आल्या आहेत. (सविस्तर वृत पान ५ वर)

## वे|ध|क

### विदर्भात अवकाळी

**नागपूर :** हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. तर काही भागात गापटीने तडाखा दिला आहे. विदर्भातील अकोल्यासह बुलढाणा जिल्ह्यात अवकाळी पावसासह गारपीट झाली. यामुळे शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. आंबा, लिंबू यासह भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्याच्या विविध भागात पुढील चार ते पाच दिवस अवकाळी पावसाची शक्यता आहे. यावर्षी समाधानकारक पाऊस पडणार असल्याची शक्यता स्कायमेट या खासगी संस्थेनं वर्तवली आहे.

### केजरीवालांची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** दिल्लीतील मद्य धोरणातील गैरव्यवहारप्रकरणी गेल्या काही दिवसांपासून सक्तवसुली संचलनालय अर्थात ईडीच्या अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा झटका बसला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांच्यावर करण्यात आलेल्या अटकेची कारवाई योग्य ठरवली आहे. अटक योग्य की चूक हे कायद्याच्या आधारे ठरते, निवडणुकीच्या वेळेनुसार नाही, अशी टिप्पणी यावेळी उच्च न्यायालयाने केली.

### भिवंडीत यंत्रमाग कारखाना भस्मसात

**भिवंडी :** शहरातील कल्याण रोडजवळ सुभाषनगर येथील मुरलीधर कंपाऊंडमधील यंत्रमाग कारखाना आगीत भस्मसात झाला. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, कच्च्या कपड्याचे ताके जळून खाक झाल्याने लाखोंचे नुकसान झाले आहे.कल्याण रोडजवळील सुभाष नगरच्या मुरलीधर कंपाऊंडमध्ये कच्चा कापड विणण्याचा यंत्रमाग कारखाना सुरू होता. सोमवारी (ता. ८) दुपारचा एकीकडे सूर्य आग ओकत असताना दुसरीकडे कारखान्यातील कापडाला अचानक आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. त्यामुळे कामगारांनी प्रसंगावधान राखत कारखान्यातून पळ काढला.

**किहीम घटना** मोबाईल कॉलवरून गुन्हा उघडकीस

# प्रियकरासोबत थाटायचा होता संसार

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

पळून जाऊन प्रियकरासोबत लग्न करून त्याच्यासोबत राहण्याची तिची इच्छा होती. त्यामध्ये अडसर ठरणाऱ्या दोन मुलांना संपवण्याचा डाव तीने घरात कोणी नसताना साधला आणि दोन चिमुकल्यांची हत्या केली. तिच्या प्रियकरासोबत होणाऱ्या मोबाईल कॉलवरून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखने हा गुन्हा उघडकीस आणला.

यवतमाळ येथील शितलचे लग्नापूर्वी गावातील जाधव नामक तरुणासोबत गेल्या सहा वर्षापासून प्रेम होते. तो ट्रक चालक आहे. तिचे लग्न पसंतीच्या मुलासोबत झाले नाही. घरच्यांनी सदानंद पोलेसोबत लग्न लावून दिले. पान २ वर

**■ एका दिवसांत जवळपास ३१ वेळा केला होता प्रियकराला फोन?**

**■ आरोपीला तीन दिवसाची पोलीस कोठडी**

### नवरा बाजारात जाताच केला प्लॅन

रविवारी ३१ मार्च रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास शितलचा नवरा वायशेतमध्ये आठवडा बाजारात खरेदीसाठी गेला होता. या संधीचा फायदा घेत तीने गमजाने त्यांचे नाक व तोंड दाबून त्यांना ठार केले. सायंकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास तिचा नवरा मुलांना खाऊ व चप्पल घेऊन मोठ्या आवडीने आला. शितल घरासमोर भांडी घासण्यात मग्न असल्याचे भासवत होती. झोपी गेलेल्या मुलांना खाऊ देण्यासाठी सदानंद उठविण्यास गेला असता, दोघेही उठले नाही. ते बेशुध्द अवस्थेत दिसून आले. त्यांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र त्यांचा मृत्यू अगोदरच झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषित केले. या दोन्ही मुलांचा मृत्यू संशयास्पद वाटल्याने त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन मुंबईतील जे. जे. रुग्णालयात केले.

### मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत...




(छायाचित्र : समीर मालोदे)

● अलिबाग शहरात नववर्षाच्या स्वागतासाठी पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली.

**आरडीसीसी बँकेच्या पगारदार खातेदारांना मिळणार**

# बिनव्याजी ॲडव्हान्स रक्कम

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्यावतीने रमझान ईद या सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील १५ हजारपेक्षा अधिक खातेदारांना बिनव्याजी ॲडव्हान्स रक्कम उपलब्ध करून दिली जाणार आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांना बँकेच्या ६० शाखांमधून ही सुविधा १० एप्रिल २०२४ पासून उपलब्ध होणार आहे.

प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक व पेन्शनर यांना मार्च २०२४ चे मासिक वेतन अद्याप प्राप्त झालेले नाही. ११ एप्रिल २०२४ रोजी मुस्लिम बांधवांचा रमझान ईद हा सण साजरा होणार असल्यामुळे महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, कोकण विभाग यांच्यावतीने गतवर्षीप्रमाणेच याही वर्षी फेस्टीवल ॲडव्हान्स योजना बँकेच्यावतीने उपलब्ध करून देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली होती. बँकेचे अध्यक्ष, आमदार जयंत पाटील आणि संचालक मंडळ यांनी सदर संघटनेची विनंती मान्य करून ही सुविधा तात्काळ कार्यान्वित केली जाणार असल्याचे संगितले. जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांना बँकेच्या ६० शाखांमधून ही सुविधा १० एप्रिल २०२४ पासून उपलब्ध असेल. याकरीता महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, कोकण विभाग या संघटनेने बँकेचे आभार मानले आहेत.

बँकेने जिल्ह्यातील आपल्या पगारदार खातेधारकांसाठी ॲडव्हान्स वेतन, खातेधारकांचा विमा, मोबाईल ॲप शिवाय फोन पे, गुगल पे यांच्या माध्यमातून पैसे ट्रान्सफर करण्याच्या अत्याधुनिक सेवा सुरू केल्याने आणि गरजेला मदत करण्याच्या ग्राहक केंद्रीत धोरणामुळे शिक्षक खातेदार वर्ग मोठ्या प्रमाणावर पान २ वर




> बँकेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील आणि संचालक मंडळाचे निर्णय तसेच शाखेतील कर्मचारी यांनी दिलेली उत्कृष्ट ग्राहक सेवा यामुळे आज बँकेने मार्च २०२४ मध्ये ७३ कोटींपेक्षा अधिक नफा कमाविलेला असून व्यवसायाचा टप्पा देखील ५२०० कोटींच्या पुढे गेला असल्याचे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी सांगितले.






कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० एप्रिल

१) श्री. मोतीराम धोंडू राऊत
अलिबाग, १०-४-१९४६

२) श्री. वसंत राघव घरत
अलिबाग, १०-४-१९४८

३) श्री. शरद शंकर मांजरेकर
अलिबाग, १०-४-१९४५

४) श्रीम. नीलिमा नीलकंठ पाटील
अलिबाग, १०-४-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**कै. आनंदी व कै. पंढरीनाथ गोवर पाटील, पुण्यतिथी, भिवंडी**

# गुढीपाडव्यानिमित्त खरेदीला उधाण

## दुचाकी वाहनांसह चारचाकी खरेदीसाठी गर्दी

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढापाडव्याच्या मुहूर्तावर मंगळवारी (दि.९) वेगवेगळ्या प्रकारच्या दुचाकी व चारचाकी वाहने खरेदी करण्यात आली. एका दिवसात तीनशेहून अधिक दुचाकी खरेदी झाली आहेत. गतवर्षीच्या तुलनेने यंदा दुचाकी खरेदीत खरेदीमध्ये दहा टक्केने वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. तसेच १०० हून अधिक चारचाकी वाहने खरेदी करण्यात आली. या निमित्ताने करोडोची उलाढाल झाली असली, तरीही गतवर्षीच्या तुलनेने चारचाकी वाहनांच्या खरेदीत २५ टक्के घट असल्याचे सांगण्यात आले आहे.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सोने, जागा, घर, वाहन खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे या कालावधीत घरगुतीपासून वेगवेगळ्या प्रकारच्या लहान मोठ्या वस्तू खरेदी करण्यावर अधिक भर दिला जातो. गुढीपाडव्याला वेगवेगळ्या वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर काही ना काही खरेदी केली जाते. यंदा गुढीपाडव्यानिमित्त मंगळवारी सकाळपासून वेगवेगळ्या शोरुमध्ये वाहन खरेदीसाठी ग्राहकांची लगबग पहावयास मिळाली. वाहन खरेदी केल्यावर सजवून त्याची मनोभावे पुजा करून ग्राहकांनी ते घरी नेले. खरेदी केलेल्या वाहनांसमवेत अनेकांनी सेल्फी व फोटो काढून सोशल मिडीयावर ते व्हायरलदेखील केले.

रायगड जिल्ह्यामध्ये यंदा होंडा, हिरो शोरुमधून दुचाकी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आल्या. पेट्रोलवर चालणाऱ्या दुचाकीला ग्राहकांनी अधिक पसंती दर्शविली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. यावर्षी गेल्या वर्षीच्या तुलनेने दुचाकी खरेदीत दहा टक्केने वाढ झाली आहे. एकूण तीनशेहून अधिक दुचाकी खरेदी झाल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले.

दुचाकीबरोबरच चारचाकी वाहनेदखील खरेदीवर ग्राहकांनी कल दिला असल्याचे पहावयास मिळाले. यंदा मात्र दीडशेहून अधिक वाहने खरेदी होणे अपेक्षित होते. परंतु फक्त शंभरच चारचाकी वाहने खरेदी झाली आहेत. त्यामध्ये आरटीका, ब्रीझा, व्हॅगनर या गाड्या खरेदीला अधिक पसंती ग्राहकांनी दर्शविली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

### सीएनजीला पसंती

**पेट्रोल, डिझेलच्या वाढत्या दरामुळे गेल्या काही वर्षापासून सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या खरेदीचा कल वाढला आहे. त्यात सीएनजीचे पंप ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी उभे राहू लागल्याने त्याचा फायदा होऊ लागला आहे.**

### इलेक्ट्रिक वाहनांचा खप कमी

विजेवर चालणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहन खरेदीचा क्रेझ गेल्या दोन वर्षात वाढली होती. मात्र जिल्ह्यात मोजक्याच ठिकाणी विद्युतपंपाचा अभाव असल्याने विजेवर चालणाऱ्या वाहनांना ग्राहकांकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात आले.



**राज्याचे नेते व विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांनी फलटण येथे जाऊन शुभेच्छा दिल्या व भावी वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.**

# बाबुरावांच्या 'एम' टॉनिककडे छबुरावांचे लागले डोळे

**। आविष्कार देसाई । रायगड ।**

**रायगड :** एका आटपाट नगरातील अंधभक्त दिल्लीतील हुकूमशहाला तिसऱ्यांदा राज सिंहासनावर बसवण्याच्या तयारी लागले आहेत. यासाठी बाबूराव यांनी आपल्याच घटक पक्षातील इच्छुक असणाऱ्या छबूरावांना मात दिली आणि निवडणुकीचे तिकीट आपल्याच खिशात घातले.

त्यामुळे छबुराव आणि त्यांचे समर्थक चांगलेच नाराज झाले. युतीमधील काही प्रमुख सुभेदार हे आधीपासूनच बाबूरावांच्या कार्य प्रणालीवर नाराज आहेत. व्हिटामिन ' एम ' टॉनिकचा डोस मिळत नाही, तोपर्यंत प्रचारालाच येणार नसल्याचा पवित्रा सर्वच छबुरावांनी घेतला आहे. त्यामुळे हुकूमशहाचे तख्त आता हलू लागले आहे.

सर्व छबुरावांना ' एम ' टॉनिक देऊन ते आपल्यासोबत दगाफटका तर करणार नाहीत ना, असा प्रश्न बाबूराव यांना पडला आहे. त्यामुळे त्यांच्यासमोर फार मोठा पेच निर्माण झाला आहे. भारत एकजुटीच्या 'अनंत' मशालीचे कडवे आव्हान पेलण्यासाठी बाबूरावांनी अन्य पर्यायांचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे.

यासाठी ते प्रत्येक प्रांतात आपल्या निवडक हुजऱ्यांसह रात्रीचा दिवस करु लागले आहेत. मात्र, प्रजेतून त्यांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येते. तोंडावर मदत करण्याचे आश्वासन मिळत असले, तरी पाठ फिरल्यावर प्रजा नाक मुरडत आहे. दलित, मुस्लिम यांनी तर मशाल दिल्लीत पोचवण्याचा निर्धार केला आहे.

### धगधगत्या 'अनंत मशालीं'चे कडवे आव्हान पेलवेना

दिल्लीच्या तख्तावर राजाला पुन्हा बसवण्यासाठी प्रजेला गुमराह करण्यात येत आहे, तर दुसरीकडे राज्याचे संविधान वाचवण्यासाठी एक धगधगती 'अनंत मशाल' पुढे सरकत आहे. या धगधगत्या मशालीच्या उजेडात अनेक कामगार, शेतकरी, कष्टकरी, महिला, युवा, वंचित, उपेक्षीत घटक सामावले आहेत.

दिल्लीचे सिंहासन उलथून लावण्याएवढे बळ आई भवानीने मनगटात द्यावे, अशी आराधना आता घराघरातून केली जाऊ लागली आहे. मशाल दिल्लीपर्यंत तेवत रहावी, यासाठी आटपाट नगरातील काही अनुभवी मंडळी सोबत आली आहेत. बाबूराव यांनी याचा चांगलाच धसका घेतला आहे.

अचानक उन्हाच्या झळा वाढल्याने अंगाची लाही लाही होत आहे. आधीच विविध बाजूने चटके बसून करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे 'एम' टॉनिक घेऊन आपला किमान बचाव तरी करता येईल, अशी धारणा छबूरावांसह अन्य मदत करणाऱ्यांची झाली आहे.

'एम' टॉनिकचा बूस्टर डोस प्यायल्यावर छबूरावांचा चमू आपल्यासाठी शत्रूशी दोन हात करणार नसल्याची भीती बाबूराव यांना वाटत आहे. त्यामुळे प्रत्येक प्रातांतील सुभेदारांकडे ' एम'टॉनिक पोहचलेले नसल्याने ते त्याची वाट पाहत आहेत.

# पोशीर धरणाचे सर्वेक्षण रखडले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत, अंबरनाथ आणि उल्हासनगर तालुक्यातील जमीन ओलिताखाली आणण्यासाठी आणि ठाणे जिल्ह्यातील महानगरे आणि शहरे तसेच औद्योगिक वसाहती यांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पोश्री नदीवर धरण बांधण्याचे सरकारचे धोरण आहे. १९७३ पासून धरण शासनाच्या पटलावर असून अद्याप कागदावरच आहे. दरम्यान स्थानिक शेतकऱ्यांच्या विरोधामुळे या प्रस्तावित धरणाच्या कामाचे सर्वेक्षण रखडले असून पाणी प्रमाणपत्रदेखील मिळालेले नाही अशी माहिती शासनाच्या कागदपत्रांवरून समोर आली आहे.

आता पोशीर धरण जलसंपदा विभागाचे कोकण पाटबंधारे विकास महामंडळ उभारणार असल्याचे बोलले जात आहे. कोकण पाटबंधारे महामंडळ यांच्याकडून जारी करण्यात आलेल्या टिप्पणीमध्ये पोश्री नदीवर बोरगाव आणि कुरुंग येथे धरण बांधण्यासाठी हालचाली सुरु केल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आणि ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तसेच उल्हासनगर तालुक्यातील शेतजमीन ओलिताखाली आणण्यासाठी धरण बांधण्याचे नियोजन कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांनी केले आहे.

## पान १ वरून



### मनसेचा महायुतीला बिनशर्त पाठिंबा

त्याप्रसंगी ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. देशाला आज खंबीर नेतृत्वाची गरज आहे. मात्र, सध्या तरी असे नेतृत्व दिसत नसले, तरी मोदींकडून मला अपेक्षा आहेत. म्हणून त्यांना प्रधानमंत्री करण्यासाठी महायुतीला पाठिंबा देत आहे. मात्र चुकीचे काही झाले तर मी त्या विरोधात बोलणार असा, इशाराही त्यांनी यावेळी दिला.

अमित शहा यांच्यासोबत झालेल्या भेटी बाबत चुकीच्या वावड्या उठवण्यात आल्या होत्या. मला शिवसेनेचा प्रमुख व्हायचे असते, तर तेव्हाच झालो असतो. मला शिवसेना फोडून प्रमुख व्हायचे नसल्याने मी माझा वेगळा पक्ष काढल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले. इंजिन या चिन्हाबाबत कोणतीच तडजोड करणार नसून मनसे हा पक्ष वाढवणार आहे.
भारत देश तरुणाचा सर्वात मोठा देश आहे. येथील तरुणांना चांगले शिक्षण, तंत्रज्ञान, व्यवसाय, नोकरीची आवश्यकता आहे. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रधानमंत्री मोदी यांनी लक्ष द्यावे. अन्यथा देशाता आराजकता माजेल असा इशाराही त्यांनी दिला. ज्या चांगल्या गोष्टी केल्या त्याबद्दल मी प्रशंसा केली आहे. ज्या गोष्टी पटल्या नाही, त्याला टोकाचा विरोध केल्याचे ते म्हणाले. देशातून सहा लाखाहून अधिक उद्योगपतींनी भारत देश सोडला आहे. हे अतिशय गंभीर आहे, असेही ते म्हणाले. राज्यात चुकीचा कॅरम फुटल्याने कोण कोणत्या राजकीय पक्षात आहे हेच कळत नसल्याचा चिमटा ठाकरे यांनी सध्याच्या राजकीय स्थितीवर भाष्य करताना काढला.निवडणुका होत असतात हे निवडणूक विभागाला माहिती असतानाद-खील शिक्षक, परिचारीका, डॉक्टर यांना निवडणुकीच्या कामाला जुंपत आहेत. त्यांनी रुग्णांची सेवा करायची, मुलांना शिकवायचे की निवडणुकीची ड्युटी करायची. या पुढे निवडणुकीच्या कामाला जाऊ नका, तुम्हाला नोकरीतून कोण काढतो हे मी पाहतो, अशी टीका त्यांनी केंद्रीय निवडणुक आयोगवर केली.मतदारांनो माझं तुम्हाला आवाहन आहे कि, 'राजकीय व्यभिचाराला राजमान्यता देऊ नका. अन्यथा चुकीचा पायंडा पडेल.' यावेळी राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुका लढवण्याची घोषणा केली. माझी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सर्व सहकाऱ्यांना विनंती आहे, उत्तम संघटना बांधणी करा, मतदारसंघ बांधा. विधानसभेच्या तयारीला लागा, असे आवाहन त्यांनी केले.एक गोष्ट स्पष्टच सांगतो, एखादी राजकीय भूमिका घेताना ती राष्ट्रहिताची, महाराष्ट्रहिताची असेल तर मी राजकीयदृष्ट्या कुठे, कुणाबरोबर आहे हे पाहत नाही रोखठोक भूमिका घेत आलो आहे, घेत राहिन. मी समर्थन, पाठिंबा देताना मनापासून देतो आणि विरोध केला तर तितकाच टोकाचा असतो. येणाऱ्या लोकसभा निवडणुका देशाच भविष्य ठरवणार आहेत. महाराष्ट्राला मोठा वाटा हवा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून मला अपेक्षा आहेत. मी फक्त मोदींसाठी पाठिंबा देत असल्याचे राज ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

### विरारमध्ये चार कामगारांचा मृत्यू

चारही मजूर गुदमरुन मरण पावले. वसई विरार पालिकेच्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ तीन मजुरांचे मृतदेह बाहेर काढले. तर अमोल घाटाळ या मजुराचा मृतदेह तीन तासानंतर अग्निशमन बाहेर काढला. शुभम पारकर (२८), अमोल घाटाळ (२७) निखिल घाटाळ (२४) आणि सागर तेंडुलकर (२९) अशी मृतांची नावे आहेत. ग्लोबल सिटीमधील १२४ इमारतीचा हा एसटीपी प्लांट आहे. त्याची साफसफाईची जबाबदारी पॉलिकॉन या कंपनीला दिली होती. आज वसई विरार पालिकेच आयुक्त अनिलकुमार पवार यांनी घटनास्थळी पाहणी केली.

### मतदान केंद्रावर 'महिलाराज'

ज्या मतदान केंद्रात पुरुषांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक आहे, त्या ठिकाणी केंद्राची पूर्ण जबाबदारी महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सोपविण्याचे ठरले आहे.

अधिकाधिक महिलांनी मतदानाचा हक्क पार पाडावा, म्हणून हा उपक्रम असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व अन्य जबाबदारी निवडणूक सेवेतील महिलाच सांभाळणा आहेत. प्रायोगिक तत्वावर सात मतदान केंद्राची निवड झाली आहे. या मतदान केंद्रांमध्ये तैनात असलेल्या पोलिसांपासून ते निवडणूक कार्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह सर्वजण महिला असतील. लैंगिक समानता आणि मतदान प्रक्रियेत महिलांच्या अधिक रचनात्मक सहभागासंबंधातील वचनबद्धतेचा भाग म्हणून आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महिलांनी चालविलेले महिला मतदान केंद्र असणार आहे. सर्व महिला नियंत्रित मतदान केंद्रात कोणताही विशिष्ट रंग वापरला जाणार नाही; तसेच मतदान केंद्रातील कुठल्याही खास राजकीय पक्षाच्या रंगाचा अनावश्यक वापर टाळण्याचे स्पष्ट निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. महिला नियंत्रित मतदान केंद्र स्थापन करण्याच्या निर्णयामुळे महिलांचा मतदानातील सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. महिला मतदान केंद्र निवडताना केंद्राची सुरक्षितता लक्षात घेतली जाणार आहे. संवेदनशील केंद्र टाळून तहसील कार्यालय, ठाण्यानजीकच्या केंद्रांची तसेच ज्या मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रियेतील अधिकाऱ्यांचा कायम संपर्क राहील, अशा केंद्राची या विशेष प्रयोगाकरिता निवड करण्यात येणार आहे. त्याचबरोबर युवा मतदान केंद्र, दिव्यांग मतदान केंद्र आणि युनिक मतदान केंद्रांची निर्मिती रायगड जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघामध्ये केली जाणार आहे. रायगड जिल्हा दोन लोकसभा मतदारसंघामध्ये विभागाला गेला आहे. यामध्ये रायगड लोकसभेसाठी चार विधानसभा मतदारसंघ तर मावळ लोकसभा मतदारसंघात रायगड जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. रायगड जिल्ह्यातील मतदानकेंद्रांपैकी सात मतदान केंद्र महिला नियंत्रित मतदान केंद्र असणार आहेत.

रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये पेण विधानसभा मतदार संघात मतदान केंद्र १०१ प्रभुआळी खोली क्रमांक १, अलिबागमध्ये मतदान केंद्र १७२ अलिबाग ५, श्रीवर्धनमध्ये १६७ उतेखोल ४, महाडमध्ये २३०, महाड ३ खोली क्रमांक ४ आणि मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये पनवेल ३३२ पनवेल महानगर पालिका शाळा खोली क्रमांक १, कर्जतमध्ये २९३, खोपोली ४९ खोली क्रमांक ३ आणि उरण विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्र २४९ उरण खोली क्रमांक ५ असे असणार आहेत.

### बिनव्याजी ॲडव्हान्स रक्कम

रायगड जिल्हा सहकारी बँकेशी जोडला गेला आहे, असे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी सांगितले. गतवर्षी देखील दिवाळी सणाच्या वेळी वेतन मिळण्यास शासनाकडून तांत्रिक कारणास्तव दिरंगाई निर्माण झाली होती. अशावेळी देखील बँकेने शिक्षक संघटनेच्या मागणीनुसार शिक्षकांना बिनव्याजी ॲडव्हान्स रक्कम उपलब्ध करून दिली होती. यासह न्यु इंडिया इन्शुरन्सच्या सहकार्याने देखील जीवन विम्याचे फायदे बँकेच्यावतीने या पगारदार खातेधारक यांना देण्यात आले होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बँकेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील आणि संचालक मंडळाचे निर्णय तसेच शाखेतील कर्मचारी यांनी दिलेली उत्कृष्ट ग्राहक सेवा यामुळे आज बँकेने मार्च २०२४ मध्ये ७३ कोटींपेक्षा अधिक नफा कमाविलेला असून व्यवसायाचा टप्पा देखील ५२०० कोटींच्या पुढे गेला आहे. यामध्ये ग्राहकांनी आमच्या बँकेवर दाखविलेला विश्वास हाच आमचा सर्वोत्तम नफा असून बँकेच्यावतीने सामाजिक बांधिलकी आणि सलोख्याच्या भावनेतून ॲडव्हान्स वेतन सुविधेचा लाभ बिनव्याजी देण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व शिक्षक खातेधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी केले आहे.

### प्रियकरासोबत थाटायचा होता संसार

लग्नानंतर ती अलिबाग तालुक्यातील किहीम आदीवासीवाडी जवळील दाजिया पटोले यांच्या वाडीमध्ये शिक्षक कॉलनीमध्ये पतीसोबत राहू लागली. लग्नानंतर तिने एक मुलगी व एक मुलगा अशा दोन लेकरांना जन्म दिला. शितल तिच्या पतीसोबत राहत असली, तरी तिचा जीव प्रियकरामध्ये गुंतला होता. सतत त्याला फोन करणे, त्याच्यासोबत पळून जाण्याचा प्लॅन ती आखत होती. मात्र तिची मुले तिला पळून जाण्यास अडसर ठरत होती. काय करावे, असा प्रश्न तिच्यासमोर उभा राहिला होता.

**पोलिसी दणका मिळाल्यावर झाली बोलकी**

प्रेमात अडथळा ठरणाऱ्या पाच व तीन वर्षांच्या चिमूकल्यांना आईनेच मारण्याचा प्रकार पोलिसांनी पाच दिवसात उघडकीस आणला. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व मांडवा सागरी पोलिसांनी तपास सुरु केला. शवविच्छेदनाच्या अहवालानुसार मुलांचा खून झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी शितलचे मोबाईल कॉल चेक केले. त्यामध्ये यवतमाळ येथील जाधव नामक व्यक्तीसोबत जास्त संपर्क असल्याचे दिसून आले. एका दिवसात जवळपास ३१ वेळा तिने प्रियकराला फोन केल्याची माहिती अनधिकृतपणे समोर आली आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर महिला पोलिसांकडून त्या महिलेची कसून चौकशी केल्यावर तिने खून केल्याचे कबूल केले.

## स्वामी समर्थ पालखी सोहळ्याचे आयोजन

**नागोठणे :** अक्कलकोट निवासी, सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रगट दिनाचे औचित्य साधून नागोठणे खडक आळीतील श्री स्वामी समर्थ महाराज आध्यात्मिक विकास केंद्रात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमत्त दुपारी दोन वाजल्या पासून श्री स्वामी समर्थांच्या पालखी सोहळ्याचे आयोजनही नागोठणे शहरात करण्यात आले आहे. या पालखी सोहळ्याची सुरूवात खडक आळीतील श्री स्वामी समर्थ महाराज आध्यात्मिक विकास केंद्रातून होणार आहे. बुधवार दि.१० एप्रिल रोजी आध्यात्मिक विकास केंद्रात होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रम ांत सकाळी ५ ते ७ वाजण्याच्या दरम्यान महापूजा, सकाळी ८.३० ते ९ वा. दरम्यान आरती, सकाळी १०.३० ते ११ वा. दरम्यान नैवेद्य आरती, दु. १२ ते २ वा. दरम्यान जप पारायण तर दुपारी २ वा. ते रात्री ८ वा. दरम्यान स्वामींचा पालखी सोहळा आणि रात्री ८ ते १० वा. दरम्यान भंडारा असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

# मरीआई प्रासादिक सेवा भजन स्पर्धा

## बाप्पा देव मंडळ विजेता

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील भाकरवड येथे मरीआई प्रासादिक सेवा भजन मंडळाच्या माध्यमातून रविवारी (दि.७) भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बाप्पादेव प्रसादिक भजन मंडळ अंतिम विजेता ठरला आहे.

या स्पर्धेत सागरगड पंचक्रोशितील ग्रामीण भागातील एकूण १५ भजन मंडळांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रामुख्याने दत्त प्रासादिक भजन मंडळ चोले, शिव सुरताल भजन मंडळ मेढेखार, मरीआई महिला भजन मंडळ तलासेत, श्री हनुमान संगीत भजन मंडळ देहेन, नवनाथ भजन मंडळ धाकटे शहापूर, श्री बाप्पादेव प्रासादिक भजन मंडळ दीवलांग, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ धेरंड, श्री विठल प्रासादिक भजन मंडळ लेभी, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ चॉकीचापाडा, श्री कृष्ण भजन मंडळ कोंघर आवेठी, मरीआई प्रासादिक भजन मंडळ धाकटे शहापूर यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमात उत्कृष्ट पखवाज




व बासरी वादक सचिन धुमाळ यांचा जुगलबंदी कार्यक्रमाने उपस्थित सर्वांची मने जिंकली. त्यामध्ये पखवाज साथ प्रतीक नाईकअ व मृदुंग निमिष जूईकर यांनी दिली.या भजन स्पर्धेत या सर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला श्री बाप्पादेव प्रासादिक भजन मंडळ, द्वितीय क्रमांक श्री कृष्ण भजन मंडळ तर तृतीय क्रमांक नवनाथ भजन मंडळ यांना सचिन भाऊ साळुंखे प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान चिन्ह व अनुक्रमे दहा, सात व पाच हजार रुपये बक्षिस देण्यात आले.

उत्कृष्ट पखवाज वादक शिव सुरताल भजन मंडळ, उत्कृष्ट गायक बाप्पादेव प्रासादिक भजन मंडळ, उत्कृष्ट चकवा नवनाथ भजन मंडळ तर, श्री विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ आणि श्री हनुमान संगीत भजन मंडळ यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. या भजन स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व सभासदांना गौरविण्यात आले.

# पत्रकार उत्कर्ष समिती उपाध्यक्षपदी खारपाटील

**। उरण । वार्ताहर ।**

पत्रकार उत्कर्ष समितीच्या सदस्यांची सभा कळंबोली येथे उत्साहात संपन्न झाली.

यावेळी अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे, उपाध्यक्ष राम जाधव, सचिव डॉ. वैभव पाटील, खजिनदार डॉ. शैलेश ठाकूर, राजेंद्र लकेश्री आदी उपस्थित होते. यावेळी पत्रकार उत्कर्ष समितीच्या भविष्यातील कार्य, वर्षा सहल, पदाधिकारी निवड, कार्डचे नूतनीकरण याबद्दल विस्तृत चर्चा करण्यात आली. पत्रकार उत्कर्ष




समितीमध्ये १५० हून अधिक पत्रकार सदस्य आहेत. पत्रकारिता करत असताना ज्या समाजात आपण रहातो. त्या समाजाबरोबर आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान लक्षात ठेऊन अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. अन्याय होतो तिथे मदतीसाठी पत्रकार उत्कर्ष समिती आवर्जून उपस्थित असते असे उपस्थितांनी सांगितले.

## विविध उपक्रमातून केली जनजागृती

**। रसायनी । वार्ताहर ।**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि आई बाबा फाउंडेशन व मुस्कान मॅजिक मंत्र यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती केंद्र येथील सभागृहामध्ये खेळीमेळीच्या वातावरणात अनेक विषयांवर मार्गदर्शन सल्लामसलत व प्रेरणादायी अशा विषयांतून दैनंदिन जीवनातील बदल आरोग्य, सतर्कता अशा विविध विषयांवर मौलिक मार्गदर्शन केले.

## रविंद्र लाड यांना केले सन्मानित

**। पेण । वार्ताहर ।**

राज्यात सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यात अग्रेसर असलेली आम्ही गिरगावकर संस्था समाजाची सेवा करीत असलेल्या मान्यवरांना समजाप्रती असलेल्या सेवेची जबाबदारी वाढावी या स्तुत्य हेतुने दरवर्षी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करते. अशाच प्रकारचा पुरस्कार म्हसळा तालुक्यातील रविंद्र लाड यांचे सामाजिक,सांस्कृतिक,आरोग्य आणि खास करून त्यांचे शैक्षणिक कामाची दखल घेऊन देण्यात आला.

# तळा शहरात पोलिसांचा रुट मार्च

**। तळा । वार्ताहर ।**

आगामी लोकसभा निवडणूक आणि येऊ घातलेले हिंदु आणि मुस्लीम धर्मियांचे सण, उत्सवाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी. तसेच समाज कंटकांवर व गुन्हेगारांवर वचक राहून, निवडणुका व उत्सव भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात याकरिता तळा पोलिसांच्यावतीने तळा शहरातून रुट मार्च काढण्यात आला.

तळा सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी आचारसंहिता कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास पोलीस यंत्रणा सज्ज आहे, असे सांगून,



कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून निवडणुका, सण उत्सव व जयंती भयमुक्त साजऱ्या कराव्यात, असे आवाहन यावेळी केले. उपविभागीय पोलीस अधिकारी सूर्यवंशी यांचे मार्गर्शनाखाली हा रूट मार्च काढण्यात आला. निवडणुका शांततेच्या वातावरणात पार पडाव्यात आणि मतदारांमध्ये विश्वासार्हता वाढीस लागावी अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलीस ठाण्यापासून मांदाड फाटा, बाजारपेठ बळीचानाका, बाजारपेठ तळा असा रुट मार्च काढून बळीचा नाका तळा येथे दंगाकाबु रंगीत तालीम घेण्यात आली. मोदी नाका ते मेटमोहल्ला, भोईरवाडी, शहरातून वरचा मोहल्ला, नगरपंचायत मार्गे बाजारपेठ असे सायंकाळी रुट मार्चचे आयोजन करण्यात आले. दंगाकाबू रंगीत तालीममध्ये तळा पोलीस ठाण्यातील ०१ पो. अधिकारी, १२ पो. अंमलदार आणि माणगांव आर.सी.पी. प्लाटूनचे ३४ जवान सहभागी झाले होते.

# नववर्षाच्या स्वागत यात्रांनी जिल्हा दुमदुमला



**नववर्षाच्या स्वागतासाठी जिल्ह्यातील सर्वच प्रमुख शहरांमध्ये, गावामध्ये सार्वजनिक स्वरुपात भव्यदिव्य शोभायात्रा काढून नववर्षाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. पारंपारिक पोषाख परिधान करुन हजारो नागरिक स्वयंस्फूर्तीने या शोभायात्रांमध्ये सहभागी झालेले होते. शहरात ठिकठिकाणी, घरोघरी उंच गुढ्या उभारुन नववर्षाचे स्वागत करण्यात आले. तसेच अनेक ठिकाणी विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच सुरु झालेल्या या शोभा यात्रांमध्ये पारंपारिक वेशभूषा, सामाजिक संदेश, युद्ध कला दर्शवणाऱ्या कसरती यांची ओळख करुन देणाऱ्या चित्र रथाची आणि कार्यक्रमाची मोठी रेलचेल असल्याचे पाहायला मिळाले.**

















## पनवेलमध्ये लाखोंची उलाढाल

हिंदू नववर्षाची सुरूवात म्हणून साजऱ्या करण्यात येणाऱ्या गुढीपाडव्यानिमित्त मंगळवारी (दि. ९) पनवेलमधील विविध वसाहतीत मोठ्या प्रमाणात शोभायात्रा काढण्यात आल्या होत्या. या यात्रांमध्ये सहभागी नागरिकांमध्ये यावेळी मोठा उत्साह पाहायला मिळाला असून, तालुक्यातील विविध सामाजिक संस्थांमार्फत या कार्यक्रमात नागरिकांनी आणि राजकीय पुढ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. हिंदू नवं वर्ष म्हणून साजऱ्या होणाऱ्या गुढीपाडव्यानिमित्त पनवेल परिसरात घरोघरी गुढी उभारण्यात आली होती. त्याचबरोबर तालुक्यातील पनवेल शहर, कळंबोली वसाहत, खारघर तसेच इतर वसाहतींमध्ये काढण्यात आलेल्या शोभायात्रांमध्ये मराठी संस्कृती दिमाखात मिरवण्यासाठी शोभायात्रा देखील काढण्यात आली होती. (छायाचित्र : राजेश डांगळे)



## रायगडमध्ये शोभायात्रेची पारंपारिक धुम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

हिंदू नववर्षानिमित्त जिल्ह्यात वेगवेगळ्या संस्था, संघटनाच्या वतीने अलिबागसह संपुर्ण जिल्ह्यात शोभायात्रा काढण्यात आली. मराठमोळा पारंपारिक पेहराव करीत तरुणाई यात्रेमध्ये सहभाग नोंदवला होता. एक वेगळा उत्साह तरुणाईमध्ये दिसून आला होता.

ग्रामीण व शहरी भागात घरोघरी गुढी उभारण्यात आल्या. हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा अनेकांनी देत हा सण जल्लोषात साजरा केला. गुढीपाडव्याचे औचित्य साधत मंगळवारी (दि.९) जिल्ह्यात २१ ठिकाणीशोभायात्राकाढण्यातआल्या. अलिबागमधील ब्राह्मणआळी येथील राममंदिर येथून शोभायात्रेला सकाळी सुरुवात झाली. शोभायात्रेसोबत वेगवेगळे ऐतिहासिक क्षणचित्रे, ढोल ताशांचा गजर, लेझीम, लाठीकाठीचे प्रदर्शन भरविण्यात आले. एक वेगळा उत्साह प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शोभायात्रेची सांगता झाली. शहरी भागासह ग्रामीण भागातील अनेक तरुणांनी एकत्र येत नववर्षाचे स्वागत जल्लोषात केले. काहींनी दुचाकीवर प्रभातफेरी काढण्यात आली.





● मुरुडमध्ये मराठी नववर्षाचे स्वागत विविध सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. यावर्षी कुणाल सतविडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुढीपाडव्यानित्तित बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये बाईकला भगवे झेंडे लाऊन कोटेश्वरी माते की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेवच्या घोषणा देत शांततेच्या मार्गाने ही रॅली मुरुड कोटेश्वरी मंदिरापासून ते काळभैरव मंदिरापर्यंत काढण्यात आली. यावेळी कुणाल सतविडकर, रूपेश जामकर, सचिन करंदेकर, प्रमोद भायदे, जागन पुलेकर, प्रदिप बागडे, आदेश दांडेकर, पद्मदुर्ग ढोल ताशा प्रमुख- नेहा पटेल, सुधीर सिंग, किर्ती शहा, मनिष माळी, आदिंसह पद्मदुर्ग ढोल ताशापथक सहभागी झाले होते.



● गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर वाहन खरेदी करताना.





## नेरळ येथे नववर्षाचे स्वागत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथे नववर्षे स्वागतानिमित्ताने मिरवणूक काढण्यात आली. नववर्षे स्वागत यात्रासमितीच्या वतीने गेली १५ वर्षे मिरवणूक काढण्यात येत असून यावर्षी देखील जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. मंगळवारी (दि. ९) नेरळ येथील चिंच आळीमध्ये असलेल्या श्री गुरुदत्त मंदिर येथून स्वागत यात्रेला सुरुवात झाली. या स्वागतयात्रेत असंख्य महिलांनी शोभायात्रेत भाग घेतला. सोबतीला ढोलकी, बाजा, स्थानिक वारकऱ्यांचे अभंगवाणी सादर करणारे भजनी मंडळ देखील होते. महिलांनी मोठे रिंगण घेऊन लेझीमच्या तालावर ठेका घेतला होता. या शोभायात्रेची जुनी बाजारपेठमधील श्रीराम मंदिरात आरतीने यात्रेची सांगता झाली.



● हिंदू धर्माच्या नववर्षाचे पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून आनंद घेताना लहान मुले (छायाचित्र -उदय कळस )

# मोदींना काँग्रेसचा धसका

काँग्रेसच्या जाहीरनाम्यावरून नरेंद्र मोदींनी राळ उठवली आहे. हा जाहीरनामा भारताचे तुकडे करणारा आणि जिनांच्या मुस्लिम लीगसारखा आहे अशी टीका ते करीत आहेत. मोदी दहा वर्षे पंतप्रधान आहेत. या काळात भारताची किती प्रगती झाली याच्या बाता ते एरवी मारत असतात. पण निवडणुकीच्या प्रचारात आपल्या कामगिरीविषयी बोलायचे सोडून ते काँग्रेसवरच घसरत आहेत. मोदींच्या भाजपकडे आत्मविश्वास नसल्याचे व तंबू में घबराट उडाल्याचे हे लक्षण आहे. त्यातही गंमत अशी आहे की, पाकिस्तानचे संस्थापक महंमद अली जिना यांच्या मजारीपुढे नतमस्तक होऊन त्यांची तारीफ करणारे लालकृष्ण अडवानी यांना याच मोदींच्या सरकारने अलिकडे भारतरत्न दिले. याच मोदींचे पूर्वसुरी असणाऱ्या हिंदू महासभेने फाळणीपूर्वी जिनांच्या लीगसोबत सहकार्य करून बंगालात सरकार स्थापन केले होते. काँग्रेसच्या राजकारणाला विरोध असल्यानेच लीगला ब्रिटिशांनी फूस दिली होती. त्या ब्रिटिशांना तेव्हाच्या हिंदुत्ववाद्यांनी मदत केली होती. आणि, आता त्यांचे वारसदार मोदी आता काँग्रेसला देशाचे तुकडे करणारा पक्ष असल्याबद्दल टीका करू पाहत आहेत. वास्तविक, काँग्रेसने या जाहीरनाम्यात मुस्लिम हा शब्द केवळ एक-दोन वेळा उच्चारला आहे. मुस्लिमांना वेगळ्या सवलती वा सुविधा देऊ अशी कोणतीही घोषणा त्यात केलेली नाही. तरीही मोदी टीका काय करतात तर म्हणे, या जाहीरनाम्याच्या प्रत्येक पानातून मुस्लिम लीगची दुर्गंधी येत आहे. इतके खोटे आरोप करणारा पंतप्रधान या देशाने पूर्वी कधीही पाहिलेला नाही. काँग्रेसने भाषा, पोषाख, खाणेपिणे इत्यादींवरून अल्पसंख्याकांबाबत कोणताही भेदभाव केला जाणार नाही असे म्हटले आहे. वास्तविक हे तर आपल्या राज्यघटनेने दिलेले आश्वासन आहे. त्याचा काँग्रेसला पुनरुच्चार का करावा लागत आहे हे सर्वांनाच ठाऊक आहे. कर्नाटकात बुरख्याला विरोध करण्याच्या नावाखाली भाजपने केलेला हिंसाचार, गोमांसाच्या संशयावरून मुस्लिमांच्या झालेल्या हत्या किंवा त्यांचा चालू असलेला छळ गेली दहा वर्षे देश पाहतो आहे.

## सर्वोच्च नेत्याची चिथावणी

उर्दूला मुस्लिमांची भाषा ठरवून केला जाणारा मूर्खपणा आणि ज्यात त्यात जिहाद शोधण्याचा वेडाचार आता हिंदू व मुस्लिमांनी आपसात प्रेमविवाह करू नये असे म्हणण्यापर्यंत गेला आहे. पंतप्रधान म्हणून मोदींनी खरे तर आपल्या भक्तांचा हे चाळे थांबवायला हवे होते. पण उलट तेच त्यांना चिथावणी देणारी भाषणे वेळोवेळी करीत आले आहेत. उत्तर प्रदेशाच्या निवडणुकीत पोषाखावरून देशद्रोही कोण हे ओळखता येऊ शकते असे आक्षेपार्ह विधान त्यांनी केले होते. कब्रस्ताने बांधली जात असतील तर स्मशानेही बांधली जायला हवीत असे देशाच्या पंतप्रधानाने म्हणावे हेच मुळात लाजिरवाणे होते. पण मोदी आणि त्यांच्या भक्तांना यातच मोठे शौर्य वाटते. या स्थितीत अल्पसंख्यांकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याचे आश्वासन जर काँग्रेस देत असेल तर ते देशद्रोहीपणाचे कसे काय असू शकते? पण मोदी तसे बोलतात आणि त्यांचे मूर्ख भक्त त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवतात. तिहेरी तलाकची प्रथा पुन्हा सुरू करू असे काँग्रेसने म्हटल्याचा प्रचार भाजपवाले सध्या करीत आहेत. तोही याच खोटेपणाचा नमुना आहे. अल्पसंख्याकांच्या वैयक्तिक कायद्यांचा सन्मान करण्याबाबत काँग्रेस जरुर बोलली आहे. मात्र त्यांच्याच सहमतीने त्या कायद्यांमध्ये सुधारणा केल्या जातील असेही त्यात म्हटले आहे. काँग्रेस देशद्रोहाचा गुन्हा रद्द करणार आहे, मुस्लिमांना न्यायालयात आरक्षण देणार आहे इत्यादी खोटे दावेही भाजपतर्फे करण्यात येत आहेत. प्रत्यक्षात काँग्रेसने लिहिणे व बोलण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे आश्वासन दिले आहे. मोदी राजवटीच्या काळात उत्तर प्रदेशातील मुस्लिम महिलेवरच्या बलात्कार प्रकरणाचे वार्तांकन करायला निघालेल्याकेरळी पत्रकाराला देशद्रोही ठरवून तीन वर्षे तुरुंगात टाकण्यात आले होते. कोरोना काळात योगींच्या उत्तर प्रदेशात माणसे रस्त्यात मरत होती. त्याच्या बातम्या देणाऱ्यांनाही सरसकट अटक केली जात होती. हे प्रकार होऊ नयेत याची तजवीज काँग्रेस करणार असेल तर त्याचे कोणीही डोके ठिकाणावर असलेला माणूस स्वागतच करील.

## वाळू सरकू लागली

पण अफवा पसरवणे हाच ज्यांचा जन्मभराचा उद्योग आहे त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा करणेही गैर आहे. पोलिसी व नोकरशाही यंत्रणा, संसद, निवडणूक आयोग, न्यायालये या सर्वच यंत्रणांचा अंधाधुंद वापर किंवा त्यांच्यावर कबजा करण्याचा प्रयत्न मोदींच्या राजवटीने केला आहे. त्याला अटकाव करण्याची व पुन्हा अशा हुकुमशाहीला वाव मिळू नये यासाठी तरतुदी करण्याची आश्वासने काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यामध्ये दिली आहेत. किंबहुना, तोच यंदाच्या त्यांच्या प्रचाराचा गाभा आहे. या आश्वासनांची चर्चा झाली तर मोदी सरकारची पापे अधिक उघडी पडतील. ती होऊ नयेत म्हणून भलतीकडेच लक्ष वळवण्याचा मोदींचा हा प्रयत्न आहे. उदाहरणार्थ, लोकसभेचा सभापती हा निष्पक्ष असावा यासाठी त्याजागी निवड झालेला नेता पक्षसदस्यत्वाचा राजीनामा देईल असे काँग्रेसने म्हटले आहे. लोकसभा किंवा विधानसभेचे सभापती व अध्यक्ष हे सत्तारुढ पक्षाचे नोकर असल्याप्रमाणे कसे वागतात हे गेल्या काळात सातत्याने दिसले आहे. महाराष्ट्रात राहुल नार्वेकरांसारख्या अध्यक्षांनी तर या पदाची शान व लाज घालवली आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी तर लोकसभा आणि ग्रामपंचायत यांच्यात काही फरकच ठेवला नाही. विरोधी सदस्यांना बोलू न देणे, त्यांची महत्वाची टीका कामकाजातून गायब करणे, विरोधी सदस्य बोलत असताना त्यांच्यावर टीव्हीचा कॅमेरा न राहील हे पाहणे असल्या गावठी कारवाया त्यांच्या काळात झाल्या. ते रोखले जाणार असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. विरोधकांना जामिनाशिवाय कितीही काळ तुरुंगात कसे डांबले जाते हे पदोपदी दिसते आहे. त्याला रोखण्यासाठी कायद्यात बदल करण्यात येईल असे काँग्रेस म्हणत असेल तर तो मोदी सरकारच्या कानाखाली काढलेला आवाज आहे व तो रास्तच आहे. लोकसभेत साठदेखील सदस्य नसलेल्या काँग्रेसचा इतका धसका मोदींनी घ्यावा यावरून त्यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे हे निश्चित.

विचार

# ‘जीआय’ मानांकनाचे पाऊल पडते पुढे

**एखादे उत्पादन विशिष्ट भागातच घेतले जात असेल आणि विशिष्ट ओळख असेल तर भौगोलिक मानांकन दिले जाते. त्यामुळे या उत्पादनाचे उगमस्थान निश्चित होऊन उत्पादकांना फायदा होतो. महाराष्ट्रातील बदलापूरची जांभळे, पेणच्या गणेशमूर्ती, कास्तीची कोथिंबीर, पानचिंचोलीची चिंच, बोरसुरीची तूर, जालनाची दगडी ज्वारी, कुंथलगिरीचा खवा आणि तुळजापूरच्या कवडीला अलिकडे असे मानांकन मिळाले. त्या निमित्ताने...**



**मधुरा कुलकर्णी**

शेती आतबट्ट्याची झाली आहे. ती परवडत नाही, अशी ओरड सुरू असते. त्यात तथ्यही आहे. शेतीचे उत्पन्न दुप्पट करू, अशी घोषणा करून चालत नाही, तर त्यासाठी भरसक प्रयत्न करावे लागतात. अलिकडच्या काळात शेतीमालाला चांगला भाव मिळतच नाही. सरकार त्यात हस्तक्षेप करत असते. या पार्श्वभूमीवर आता शेतकरीच आपापले मार्ग शोधायला लागले आहेत. काही ठिकाणी संशोधकही त्यांच्या मदतीला येत असतात. फिनलंडमध्ये शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे प्रमाण ४९ टक्के आहे. भारतात हे प्रमाण पाच टक्क्यांच्या आत आहे. शेतीमालाचे मूल्यवर्धन करायचे असेल, तर त्यावर प्रक्रिया करण्याचे प्रकल्प वाढले पाहिजेत; परंतु तसे होताना दिसत नाही. त्यातही अन्य क्षेत्रात सुरू झाले, तसे शेतीक्षेत्रात महत्वाकांक्षी स्टार्ट अप्स सुरू झालेले नाहीत. शेतीमालावर प्रक्रिया करण्याच्या घोषणांची संख्या खूप आहे; परंतु त्या प्रत्यक्षात आलेल्या नाहीत. त्यासाठीच्या विशेष आर्थिक क्षेत्राचे काय झाले, याचा आढावा घ्यायलाही सरकारला वेळ नाही. शहरीकरणाचा वेग वाढत असताना ग्रामीण संस्कृतीकडे दुर्लक्ष होत आहे. शेतीत आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांमध्ये शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेतीकडे वाढलेला कल आणि गामीण भागातील वस्तूंना भौगोलिक मानांकन (जीआय) मिळण्याचे वाढलेले प्रमाण हे चांगले लक्षण आहे. ग्रामीण संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, यासाठी शास्त्रज्ञ गणेश हिंगमिरे यांनी राज्यातील चिंच, जांभूळासह पेणच्या गणपतीला पेटंट मिळवून दिले आहे. राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळावी, यासाठी हिंगमिरे करत असलेले प्रयत्न निश्चितच शेतकऱ्यांना उभारी देणारे आहेत.

देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ पेटंट अर्थात जिओग्राफिकल आयडेंटिफिकेशन (जीआय) मिळवून देण्याचे उद्दिष्ट बाळगण्यात आले होते. महाराष्ट्रातील २९ पदार्थांना आधीच पेटंट मिळाले आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील नऊ आणि बोडोलँडमधील १७ पदार्थांच्या जीआयसाठी अर्ज करण्यात आले. जीआय मिळवण्यासाठी संबंधित पदार्थांचा इतिहास, भूगोल आणि विज्ञान माहीत असणे आवश्यक असते. ‘अ‍ॅग्रिकल्चर’ आणि ‘नॉन-अ‍ॅग्रिकल्चर’ अशा दोन प्रकारच्या पदार्थांना, वस्तूंना जीआय मानांकन दिले जाते. चीन आणि युरोपच्या तुलनेत भारतात अतिशय कमी जीआय मिळाले आहेत. जीआय करण्यासाठी अर्ज करणे, छाननी करणे, अधिकृतता तपासणे, सादरीकरण करणे आणि निकाल देणे अशी प्रक्रिया पार पाडली जाते. भारतात आणखी नऊ उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. यामध्ये आसाममधील गामोचा, तेलंगणामधील तंदूर रेड ग्रामी, महाराष्ट्रातील अलिबाग येथील पांढरा कांदा यांचाही समावेश आहे. पाच भौगोलिक मानांकने एकट्या कर्नाटक राज्यातील शेतीविषयक उत्पादनांना देण्यात आली आहे.

भौगोलिक मानांकन म्हणजे नेमके काय, उत्पादकांना तसेच मूळ उत्पादनाला त्याचा काय फायदा होतो या प्रश्नांची उत्तरे जाणून घेतली पाहिजेत. एखादे उत्पादन विशिष्ट भागातच घेतले जात असेल आणि त्या उत्पादनाला विशिष्ट ओळख असेल तर भौगोलिक मानांकन दिले जाते. कोणत्याही उत्पादनाला भौगोलिक मानांकन मिळाल्यास त्या उत्पादनाचे उगमस्थान निश्चित होते. नफा तसेच गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी उत्पादकांना त्याचा फायदा होतो. भौगोलिक मानांकन हे उत्पादन आणि प्रदेशाशी निगडित आहे. कारण वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीमुळे वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादित केले जाणारे एकच उत्पादन वेगवेगळ्या गुणवत्तेचे असू शकते. त्यामुळे गुणवत्तेची ओळख कायम ठेवण्यासाठी भौगोलिक मानांकन महत्त्वाचे ठरते. भौगोलिक मानांकनामुळे उत्पादकाला अनेक अधिकार प्राप्त होतात. भौगोलिक मानांकनामुळे भेसळयुक्त उत्पादनाची निर्मिती तसेच विक्री करण्यास आळा बसू शकतो. दार्जिलिंग चहाचे उत्पादक अन्य ठिकाणी उत्पादित केलेल्या चहाला ‘दार्जिलिंग’ या शब्दाचा वापर करण्यास मज्जाव करू शकतात. दार्जिलिंग येथे निर्माण होणाऱ्या चहाची गुणवत्ता अन्य ठिकाणी उत्पादित केल्या जाणाऱ्या चहाच्या गुणवत्तेपेक्षा वेगळी असते. याच कारणामुळे भौगोलिक मानांकनाच्या नियमांनुसार दार्जिलिंग चहाचे उत्पादक अन्य चहा उत्पादकांना दार्जिलिंग हा शब्द वापरण्यास मनाई करू शकतात. भौगोलिक मानांकनाचा उपयोग त्या त्या उत्पादनाच्या संरक्षणासाठी होतो. शेती, अन्न, वाईन, स्पिरिट्स, हस्तकला, औद्योगिक उत्पादने या क्षेत्रांमध्ये उत्पादित होणाऱ्या उत्पादनांना भौगोलिक मानांकने दिली जातात.

भारतामध्ये सध्या एकूण ४३२ उत्पादनांना भौगोलिक मानांकने आहेत. यामध्ये कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, केरळ या राज्यांना सर्वाधिक भौगोलिक मानांकने मिळाली आहेत. भौगोलिक मानांकने मिळालेल्यांपैकी ४०१ उत्पादने मूळची भारतीय तर ३१ उत्पादने परदेशातील आहेत. कर्नाटक, तामिळनाडू यांच्याकडे सर्वाधिक भौगोलिक मानांकने आहेत, उत्तर प्रदेशकडे ३५, महाराष्ट्राकडे ३१ तर केरळकडे ३५ भौगोलिक मानांकने आहेत. दरम्यान, भारत सरकारने आगामी तीन वर्षांमध्ये भौगोलिक मानांकनाचे महत्त्व लोकांना समजावे यासाठी जनजागृती करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी सरकारने ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. भारतात भौगोलिक मानांकन मिळालेली अनेक प्रसिद्ध उत्पादने आहेत. यामध्ये बासमती तांदूळ, दार्जिलिंग चहा, चंदेरी फॅब्रिक, म्हैसूर सिल्क, कुल्ली शॉल, कांग्रा चहा, तंजावूर पेंटिंग्ज, अलाहाबाद सुर्खा, फारुखाबाद प्रिंट्स आदी उत्पादनांचा समावेश आहे. आसामच्या सहा पारंपरिक हस्तकला उत्पादने-वस्तूंना भौगोलिक मानांकन (जीआय) टॅग मिळाले आहे. यात बिहू ढोल, जापी (बांबूपासून बनविलेली पारंपरिक टोपी), सारथेबारी येथील बेल धातूची हस्तकला, आसाम अशारिकांडी तेराकोट्टा हस्तकला, आसाम मिसिंग हातमाग उत्पादने आदींचा समावेश आहे. ‘नाबार्ड’, ‘आरओ’ गुवाहाटीच्या मदतीने आसाममधील सहा पारंपरिक हस्तकला उत्पादनांचा जीआय तज्ज्ञ डॉ. रजनीकांत यांनी जीआय टॅग देऊन सन्मान केला आहे. या हस्तकलांना जीआय टॅग मिळावा यासाठी २०२२ मध्ये अर्ज दाखल करण्यात आले होते.

महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण बाबींसाठी देण्यात येणाऱ्या भौगोलिक मानांकनांमध्ये या वेळी बदलापूर, बाहडोळीची जांभळे, पेणच्या गणेशमूर्ती, लातूर जिल्ह्यातील कास्ती या गावाची कोथिंबीर, निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथील चिंच आणि बोरसुरी येथील तुरीचा समावेश करण्यात आला आहे. जालनाची दगडी ज्वारी, धाराशीव जिल्ह्यातील कुंथलगिरीचा खवा आणि तुळजापूरच्या कवडीला यामध्ये स्थान देण्यात आले आहे. राज्यातून पाठवलेल्या १८ प्रस्तावांना भौगोलिक मानांकन मिळावे, असे प्रयत्न सुरू होते. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील कास्ती भागातील कोथिंबिरीला एक प्रकारचा वेगळा सुगंध आहे. बासमती तांदळाप्रमाणे या कोथिंबिरीला वेगळा वास आहे. मुंबई, नागपूर या मोठ्या शहरांसह अन्य देशामध्येही कोथिंबीर निर्यात करण्यात येते. निलंगा तालुक्यात बोरसुरी हे गाव आहे. येथील वरण प्रसिद्ध आहे. या भागात बोरसुरी वरणाची मेजवानी करण्यात येते. त्याला डाळ असे संबोधले जात असले, तरी या गावातील वरणात टाकल्या जाणाऱ्या मसाल्यामुळे याला नामांकन मिळाले असल्याचे सांगण्यात येत आहे. पानचिंचोली या गावातील चिंचेचा आकार सहा ते आठ इंचांपर्यंत असतो. गेल्या ३०० वर्षांपासून या गावातील चिंच प्रसिद्ध आहे. या वेळी त्याची वैशिष्ट्ये मांडण्यात आली. लातूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी बी. पी. पृथ्वीराज यांनी या कामासाठी विशेष लक्ष घातले होते. येथील पातडी चिंच उत्पादक संघाच्या वतीने बोरसुरी येथील तूर डाळ उत्पादक संघाने बोरसुरी तूर डाळ विशेष भौगोलिक मानांकन मिळावे, अशी मागणी केली होती. त्यामुळे या तीन वाणाला आता देशभर वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

धाराशीव जिल्ह्यातील भूम तालुक्यात दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. कुंथल या शब्दाचा अर्थ कुरळा असा होतो. हा भाग डोंगराळ आणि कुरळ्या केसाच्या आकाराचा असल्याने येथे जनावरांची संख्या अधिक आहे. तुळजापूरला येणारे भाविक कवड्यांची माळ घालतात. स्त्री देवतांचे उपासक कवडी आवर्जून वापरतात. शिवाजी महाराज गळ्यात कवडयांची माळ घालत. जालन्याची ज्वारी टणक असते. पक्ष्यांना ती सहज फोडता येत नाही. आता या वस्तूंना मानांकन मिळाल्याने त्यांची आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात दोन पैसे येऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

आजकाल

# केवळ तीस शहरांचा होतोय विकास

**संजीव चांदोरकर**

महरेरा’’ हे महाराष्ट्र राज्याचे घरबांधणी उद्योगाचे नियामक मंडळ (रेग्युलेटर) आहे. प्रत्येक घरबांधणी विकासकाला महरेरा कडून आपल्या प्रास्तवित गृहनिर्माण प्रकल्पाची नोंदणी करून मंजुरी घ्यावी लागते.

२०२३-२४ या सरत्या वर्षात महरेराने राज्यातील ४३३२ गुरहप्रकल्पना मंजुरी दिली त्यातील १८७५ गृहप्रकल्प फक्त मुंबई महानगर प्रदेशातील आहेत ;

आपली पोस्ट वेगळ्या कारणासाठी आहे. महेररा संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी आहे; ज्या राज्याचे क्षेत्रफळ ३,००,००० (तीन लाख) चौरस किलोमीटर आहे; मुंबई महानगर (मेट्रोपॉलिटन एरिया) चे क्षेत्रफळ आहे ६,५०० चौरस किलोमीटर; म्हणजे राज्याच्या क्षेत्रफळाच्या २.५ % राज्यात जेवढे गृहनिर्माण प्रकल्प सुरु आहेत / होणार आहेत त्यातील ४० % गृहप्रकल्प राज्याच्या या दोन / तीन टक्के क्षेत्रफळात होत असतात.

याची राजकीय अर्थव्यवस्था समजून घेणे हा आपला पोस्टचा विषय आहे;

लक्षात घ्या. घरे जरी बेघरांसाठी असतात तरी घरे बांधणारे जेथे बेघर बहुसंख्येने असतात तेथे घरे बांधायला जात नाहीत. ते घरे अशा ठिकाणी बांधू इच्छितात जेथे आर्थिक विकास होत असतो/ होऊ घातलेला असतो; कारण घर एक जैविक/ऑरगॅनिक एंटीटी आहे

फक्त मुंबई महानगर प्रदेश नाही तर राज्यातील पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर असे काही अक्ष धरले तर त्या अक्षाच्या भोवती समकेंद्री वर्तुळे (कॉन्सन्ट्रेक सर्कल्स) काढली तर जो काही भूभाग आहे त्यावरच सर्व काही होत आहे.

वर उल्लेख केलेल्या गृह प्रकल्पांपैकी उरलेले ६० टक्के गृहप्रकल्प याच यादीतील शहरात होत आहेत.

भांडवली गुंतवणूक/संघटित, असंघटित क्षेत्रातील रोजगार निर्मिती/पायाभूत सुविधा विकास / नागरी विकास/ सामाजिक पायाभूत सुविधा, म्हणजे शाळा, इस्पितळे, मार्केट्स / विजेची उपलब्धता आणि खप/ पाण्याची उपलब्धता आणि खप .......

तुम्ही नाव घ्या आणि ते सर्व याच हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या विकासांच्या बेटांवर होत आहे. तर आपल्या पोस्टचा विष्य गृहनिर्माण नसून विकासाच्या बेटांचा आहे. गृहप्रकल्प एक पॉइंटर आहे.

पूर्वी असे मानले जायचे कि मार्केट शक्ती ज्या भूभागाचा आर्थिक विकास करू इच्छित नाहीत ते भूभाग सार्वजनिक वित्त स्रोतातून शासनाने करावेत. आता शासन / सार्वजनिक वित्त स्रोत, आर्थिक धोरणे मार्केटच्या पायलट कार सारखे असतात; मार्केट साठी ते हमरस्ता बनवतात. ते विविध मार्केट शक्तींना सहाय्यभुत भूमिका करतात;

कारण केपीएमजी / मॅकेन्झी / डीलॉइट या अंतरराष्ट्रीय आणि अनेक देशांतर्गत अनेक सल्लागार कंपन्या दोघांसाठी, म्हणजे शासनाला आणि कॉर्पोरेट क्षेत्राला एकाच वेळी सल्लागार म्हणून काम करतात; त्यांच्याच वर्गातील लोक मंत्रालयात. बँकामध्ये, दलाल स्ट्रीट आणि सर्व निर्णय घेणाऱ्या संस्थात असतात. महाराष्ट्रात जे काही घडत आहे ते काही अपवाद नाही आज देशात आर्थिक क्षेत्रात जे काही घडत आहे ते मोजून ३० प्लस शहरात घडत आहे.

ज्यांच्या खाली असणारा भूभाग देशाच्या एकूण भुभगाच्या फारतर पाच टक्के असेल.

देशात सरकारी आकडेवारी प्रमाणे ५००० पेक्षा जास्त शहरे आहेत; पण छोटी शहरे अजून छोटी होत आहेत आणि मोठी महाकाय. एक दिवस फुटतील त्या पाणी पिणाऱ्या बेडकासारखी

रियल इस्टेट कंपन्या / कॉर्पोरेटच्या गुंतवणुकी / पायाभूत सुविधा / मेट्रो रेल्वे प्रकल्प / शेअर मार्केटमधील गुंतवणूकदार / आणि वरील सर्व यादी याच ३० ते ५० शहरात ; हीच शहरे देशाच्या जीडीपीच्या ६० टक्के ते ७० टक्के जीडीपी देत आहे. सारी मूल्य वृध्दी येथेच मेनस्ट्रीम फक्त ही एकच बाजू हायलाईट करते. जिडीपी. किती लाख कोटी भांडवली गुंतवणूक इत्यादी

मानवी जीवनाची गुणवत्ता, हरवलेली शांती, वखवख, असुरक्षितता, ऊर्जा आणि पाण्याची महाकाय मागणी, गर्दी, वाहतूक कोंडी, कार्बन एमिशन्स, पर्यावरणीय ऱ्हास ....... तुम्हीच काढा यादी

मानवी जीवनाची गुणवत्ता आणि लोक जेथे राहतात तेथील घनता यांचे संबंध व्यस्त असतात. अधिक घनता, अधिक नरक समान जीवन आणि जमलं तर ; यात सामावल्या न जाणाऱ्या आपल्या ७० टक्के नागरिक भावा/बहिणींचा विचार मनात आणा; जे सरकार तुमच्या साठी निर्णय घेतेय, ते सरकार ती लोक देखील निवडून देतात. त्यांना सरकार काय देत असते. हे सगळे नैसर्गिक रित्या घडत आहे. त्यात काहीही गंभीर नाही असे वाटणाऱ्या लोकांनी जे वाचले ते विसरून जावें. हे सगळे मानव निर्मित आहे. आपण मरणार आहोत. पृथ्वी असेल. न जन्मलेल्या पिढ्या असतील. त्यांनी विचार करावा.

लोकसंसद

## वीज दर वाढीवर पर्याय अनिवार्य !

भारतात सूर्य प्रकाश विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. उन्हाळ्यात तर याची उपलब्धता किती मुबलक प्रमाणावर असते? याची कल्पना सर्वांना आहेच. वीज दर वाढीचे चटके सहन करायचे नसल्यास सौर ऊर्जेच्या उपयोगाला पर्याय नाही. हा ऊर्जेचा एकमेव नैसर्गिक स्रोतच दिलासा देणारा आहे. मात्र अद्यापही लोकांना त्याविषयी नसलेले गांभीर्य नगण्य आहे. त्यामुळे ऊर्जेचा विनामूल्य स्रोत उपलब्ध असूनही त्याचा लाभ करून घेण्यात ते पुष्कळ मागे आहे. भारतात ग्रामपंचायत- विधानसभा- मनपा- लोकसभा यांच्या निवडणुका होत असतात. त्यांच्या प्रचारासाठी प्रत्येक राजकीय पक्ष खर्च करत असतो. सामान्य लोकांच्या जीवनात प्रकाश आणण्याचे काम करण्याची संधी या निमित्ताने आहे. त्यासाठी आवश्यकता आहे ती केवळ प्रबळ राजकिय इच्छाशक्तीची. सरकारी पैशांतून सोयी उपलब्ध होइपर्यंत लोकांनी प्रतीक्षा का करावी? निवडणुकांसाठी खर्च न करण्याच्या विषयावर सर्वच राजकीय पक्षांचे एकमत झाले तर उत्तमच. निवडणुकांवर पैसे खर्च न करता तोच पैसा वीज पुरवठादार आस्थापनाला देणे. खासगी, सरकारी आस्थापने दिलेल्या पैशांचा उपयोग कसा करतात? यावर बारीक लक्ष ठेवणे. येथे वीज देयकावर सवलत देणे हे सूत्र नसून वीज दर वाढीच्या शॉक लागण्यापासून ग्राहकांना दिलासा मिळणे हे प्रमुख सूत्र आहे. **- जयेश राणे,** भांडुप, मुंबई

# मराठी साहित्यिक दिनविशेष

### अकरा एप्रिल

**१३१७ :-** शके १२३९च्या चैत्र भगवक्त, संत गोरा कुंभार समाधिस्थ झाले, त्या दिवशी ही तारीख होती. सगुणभक्तीला गोरोबांनी अध्यात्मज्ञानाची जोड दिली आणि तुलनेने कमी, परंतु अर्थगर्भ अभंगरचना केल्या. त्यातून त्यांच्या वैराग्य ज्ञानाची व सगुण भक्तीची खूण ते. वेदांत परिभाषेतील शब्द व अनुभवाच्या खुणा त्यात भरपूर आहेत. उदा. ‘केशवाचे भेटे लागलेंसे पिसे। विसरले कैसे देहभान।। अशी गोरोबांची वाणी. त्याबद्दल कविवर्य मोरोपंत म्हणतात, ‘सद्गुरु अनुग्रहाविण हरिला तो कठिण सर्वथा पटणे। गोरा संत परीक्षा मस्तकि हाणूनि सर्व थापटणे।।’ **१८४३ :-** ‘विविधज्ञानविस्तार’ मासिकाचे आद्य संपादक, मराठीतील ‘मोचनगड’ या पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे जनक, मराठी लघुलिपीचे आद्य उत्पादक रामचंद्र भिकाजी गुंर्जीकर यांचा जन्म. **१८७३:-** ‘हुंडणावळीचे दरासंबंधी वाद’ ‘बँका आणि त्यांचे व्यवहार’ आदी पुस्तके विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या वर्षात लिहिणारे अर्थशास्त्रविषयक लेखक वामन गोविंद काळे यांचा जन्म. **१८८८:-** बालसाहित्यिक पारुजी नारायण मिसाळ यांचा जन्म. १९३४ मध्ये त्यांनी ‘बाल सन्मित्र’ हे मुलांचे पाक्षिक सुरु केले होते. **१९०१:-** अर्थतज्ज्ञ, सहकारी चळवळीचे अध्वर्यू, संसदपटू आणि लेखक धनंजय रामचंद्र गाडगीळ यांचा जन्म. २५ हून अधिक ग्रंथ आणि लेखसंग्रहाचे दोन खंड. अशी त्यांची ग्रंथसंपदा होय. भारताचा आर्थिक इतिहास हा त्यांचा खास विषय होता. **१९०१:-** चरित्रकार अनुवादक प्रा. श्रीपाद रामचंद्र पारसनीस यांचा जन्म. फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक असणाऱ्या पारसनीसांनी प्रो. वा.ब. पटवर्धनांच्या ‘विल्सन फिलॉलॉजिकल लेक्चर्स’ च्या अनुवादाने लेखन क्षेत्रात प्रवेश. ‘ना. गोखले’, ‘न्यूटन’ यांचा चरित्रे त्यांनी लिहिली. **१९०७:-** लेखक, पत्रकार, संपादक, कादंबरीकार आणि नाटककार म्हणून गाजलेले मोतीराम गजानन रांगणेकर यांचा जन्म. ‘अरुण’ हे मासिक आणि ‘तुतारी’ हे साप्ताहिक त्यांनी सुरु केले. याशिवाय ‘चित्रा, आशा’ या साप्ताहिकांबरोबर ‘सत्यकथा’ या मासिकाचे संपादनही केले. तथापि ते गाजले नाटककार म्हणून. त्यांनी एकूण २० नाटके तसेच एकांकिका लिहिल्या. चित्रपटांच्या वाढत्या प्रभावामुळे अनेक नाट्यसंस्था अडचणीत आल्या असताना रांगणेकरांनी ‘नाट्यनिकेतन’ ही नाटयसंस्था काढली. त्याद्वारे ‘आशीर्वाद’ हे नाटक रंगभूमीवर आणले. त्यानंतरचे ‘कुलवधू’ हे नाटकही खूप गाजले. त्यांनी ‘नंदनवन अलंकार’, ‘माझं घर’, ‘वहिनी’, ‘आश्रित’, ‘एक होता म्हातारा’, ‘कोणे एके काळी’, ‘माहेर’, ‘रंभा’, ‘लिलाव’, ‘भटाला दिली ओसरी’, ‘हेही दिवस जातील’ आदी नाटके त्यांनी लिहिली. याशिवाय त्यांनी ‘सीमोल्लंघन’ आर्णि ‘मृगजळ’ यासारख्या कादंबऱ्याही लिहिल्या. याशिवाय ‘रांगणेकर’ हे विनोदी लेखांचे पुस्तकही प्रकाशित आहे. १९१५:- योगाचे अभ्यासक आणि या विषयावरील एक लेखक डॉ. पुरुषोत्तम करंबळेकर यांचा जन्म. ह्यांचे ‘पतंजली योग सूत्र’, ‘योगविद्याधाम’ हे ग्रंथ प्रसिध्द. **१९३१:-** लेखक, कवी सुरेश रघुनाथ मथुरे यांचा जन्म. ‘युकॅलिप्टस’ या काव्यसंग्रहासह ‘चंद्रकांत राजाची कन्या’, ‘चकवणारी कोडी’, ‘विज्ञानाचे वाटोडे’ इत्यादी पुस्तके प्रसिध्द. **१९३३:-** ‘घरोघरी ज्ञानेश्वर जन्मती’ या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक, ख्यातनाम डॉक्टर ह. वि. सरदेसाई यांचा जन्म. **१९३६:-** लेखक, शाहीर करके पाटील कुंतीनाथ देवेंद्र यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत ‘कथा ही महावीरांची’ हे चरित्र, ‘खुळं पेरलं येडं उगवलं’ हे लोकनाट्य. ‘चैत्रपालवी’, ‘पाझर’ ही काव्य. ‘जलधारा’ हा भक्तीगीतसंग्रह. ‘नवा शाहीर’ ही लोकगीते आणि ‘रणझुंजार’, ‘शाहीर’, ‘झंकार’ हे पोवाडे संग्रह अशी साहित्य संपदा. **१९३७:-** ज्ञानकोशकार आणि आपल्या लेखनातून रुढ विचारसरणीला धक्का देणारे विचारवंत, इतिहासतज्ज्ञ, कादंबरीकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे निधन. ‘विद्यासेवक’ या त्यांच्या मासिकातून त्यांची ‘नि:शस्त्रांचे राजकारण’ ही लेखमाला गाजली. ‘परागंदा’, ‘आशावरी’, ‘भटक्या’, ‘विचक्षणा’ या कादंबऱ्या, ‘ब्राम्हणकन्या’, ‘गावसासू’ ही पुस्तके तसेच प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास, ‘भारतीय समाजशास्त्र इत्यादी ग्रंथ लिहिले. **१९४३:-** ‘लष्कर’ या विषयावर विविध वर्तमानपत्रे, मासिके यातून सातत्याने लेखन करणारे निवृत्त कर्नल सुनिल देशपांडे यांचा जन्म. **१९४५:-** कवी, कथाकार, ललित लेखक अशोक बेंडखळे यांचा जन्म. २० प्रकाशित पुस्तके त्यात स्वतंत्र १४, ‘ऋतुस्पर्श’ हे ललित लेख, ‘गंधकाठ’ कविता, ‘मिखाईल गोर्बाचेव्ह’, ‘सी.डी. देशमुख’, ‘क्रांतीवीर भगतसिंग’, ‘लाला लजपतराय’, ‘आयझॅक न्यूटन’, ‘बखर एका पांडुरंगाची’ ही सर्व चरित्रे, ‘रुपेरी पडद्याआड’ चित्रपट लेख, ‘मुलखावेगळे छंदिष्ठ’ व्यक्तिपर लेख, ‘पत्र वृत्तांत’ इतिहास, ‘बिनचेहऱ्याची माणसे’ व्यक्तिपर लेख, ‘२६/११ ची शौर्यगाथा’ आणि ऐतिहासिक ‘महाड’, ‘अनुवाद निकोबारच्या लोककथा’, ‘सूर्य नसलेले आभाळ’, ‘आम्ही खारेपाटणचे पाटणकर’, ‘ग्राहक आणि ग्राहकदिन’, ‘मराठी बोलू कौतुके’, ‘मराठी कथा: ‘परंपरा आणि नवता’ हे संपादित. याशिवाय समाजात ग्रंथसंस्कृती वाढावी म्हणून सजग आहेत. आयडियलच्या कांताशेटच्या सहकार्याने ‘आयडियल स्तंभलेखक चर्चा’ सुरु केल्या. पारल्यामध्ये लेखक रविंद्र पिंगे यांच्या सहकार्याने ‘पारले संवाद’ हा मंच सुरु केला. **२००४:-** लेखक ‘रुद्रवाणी’ चे संपादक जीवन किर्लोस्कर यांचे निधन.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# महाविकास आघाडीचे उमेदवार ठरले

## ठाकरे गट २१, शरद पवार गट १०, काँग्रेस १७ जागांवर लढणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीचे अखेर जागा वाटप जाहीर झाले आहे. महाविकास आघाडीत ठाकरे गट २१, शरद पवार गट १० आणि काँग्रेस १७ जागांवर लढणार आहे.

शिवसेना ठाकरे पक्षाच्या २१ जागांमध्ये जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, बुलढाणा, हातकलंगणे, संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ-वाशिम, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण, मुंबई ईशान्य या मतदारसंघांचा समावेश आहे. काँग्रेसच्या १७ जागांमध्ये नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, मुंबई उत्तर मध्य, मुंबई उत्तर, पुणे, लातूर, सोलापूर, रामटेक, कोल्हापूर मतदारसंघाचा तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला देण्यात आलेल्या १० जागांमध्ये बारामती, शिरुर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर दक्षिण, बीड या मतदारसंघांचा समावेश आहे.




## वे|ध|क

### खडसे विरुद्ध पाटील असा सामना

**रावेर :** रावेर मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे उद्योगपती श्रीराम पाटील यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली आहे. पुणे येथे पक्षाचे नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील जळगाव जिल्ह्यातील माजी आमदार सतीश पाटील, जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील, महिला आघाडी प्रदेश अध्यक्षा रोहिणी खडसे आदी यावेळी उपस्थित होते.

### धाराशिवच्या जागेसाठी शिवसैनिकांचे शक्तिप्रदर्शन

**ठाणे :** धाराशिव मतदार संघाची जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला गेल्याने अस्वस्थ झालेल्या शिवसैनिकांनी सोमवारी मुख्यमंत्री शिंदे यांच्या निवासस्थानी ठाण मांडत शक्तिप्रदर्शन केले. धाराशिवची जागा शिवसेनेचाच मिळावी, असा आग्रह त्यांनी धरला असून रात्री उशिरापर्यंत ते मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी थांबले होते. २०१९ ला शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर निवडून आले होते. परंतु, शिवसेनेतील बंडानंतर राजकीय समीकरणे बदलली असून निंबाळकर यांनी उद्धव ठाकरे यांनाच साथ दिली आहे. त्यामुळे या जागेसाठी कार्यकर्ते आग्रही आहेत.

### उमेदवारांची भाऊगर्दी

**बुलढाणा:** बुलढाणा मतदारसंघाच्या रणसंग्रामात तब्बल २१ उमेदवार मैदानात असल्याने उमेदवारांची भाऊगर्दी झाली आहे. यामुळे राजकीय पक्ष, मतदारच नव्हे तर निवडणूक विभागाची देखील डोकेदुखी वाढली आहे. मतदान संचाची क्षमता नोटासह १६ इतकी असते. वरील १५ ठिकाणी उमेदवारांचा तपशील आणि सर्वात शेवटी नोटावरील पैकी कोणीही नाहीचे बटन राहते. २१ उमेदवार रिंगणात आहेत. त्यामुळे ईव्हीएमला आणखी एक बॅलेट युनिट जोडावे लागणार आहे.

## ‘वर्षा’वर मुख्यमंत्र्यांची राजकीय बैठक

### निवडणूक आयोगाची कारणे दाखवा नोटीस

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असनाताही मुख्यमंत्र्याच्या शासकीय निवासस्थानी ‘वर्षा’वर होत असलेल्या राजकीय बैठकांची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी शिवसेनेच्या सुकाणू समितीची बैठक वर्षा बंगल्यावर पार पडली. या बैठकीस शिवसेनेचे मंत्री, आमदार तसेच नेतेही



उपस्थित होते. या बैठकीवरून वादंग निर्माण झाला आहे. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सचिन सावंत यांनी याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असून आचारसंहिता भंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. देशभरात आचारसंहिता लागू होऊन दोन आठवडे उलटून गेले तरी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थांनावर सतत राजकीय बैठका होत आहेत. हा आचारसंहितेचा खुलेआम भंग आहे. राज्य निवडणूक अधिकारी जागे आहेत का, अशी विचारणा सावंत यांनी केली होती.

त्याची दखल घेत आयोगाने लगेच मुंबई शहर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत.

### ‘गद्दारांना धडा मिळाला’

**बुलढाणा :** शिवसेना व बाळासाहेब ठाकरे यांच्या पाठबळामुळे मोठे होऊन त्यांनी गद्दारी केली. त्यापैकी पाच गद्दारांना निवडणुकीपूर्वीच उमेदवारीच न मिळाल्याने धडा मिळाला आहे. उर्वरित गद्दारांना जनता अर्थात मतदार धडा शिकविणार असल्याची टीका शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली. बुलढाणा मतदारसंघातील आघाडीचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांनी आज अर्ज दाखल केला. यानंतर पार पडलेल्या सभेत त्या बोलत होत्या. यावेळी आदित्य ठाकरे, अंबादास दानवे, जालिंदर बुधवत, राष्ट्रवादीचे रोहित पवार यांची प्रमुख उपस्थित होते.

## संजोग वाघेरे-पाटील यांच्या प्रचाराला सुरूवात

। पनवेल । वार्ताहर ।

३३ मावळ लोकसभा मतदार संघ महाविकास आघाडीचे शिवसेना बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार संजोग वाघेरे -पाटील यांच्या प्रचाराचा नारळ पनवेल शहरातील श्री हनुमान मंदिर लाईन आळी येथे वाढवून धडाक्यात सुरुवात करण्यात आली.

या प्रचार रॅलीचा मार्ग लाईन आळी हनुमान मंदिर, जय भारत नाका, मिरची गल्ली, पंचरत्न हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे प्रचार तसेच परिचय पत्रक देऊन व मशाल चिन्हासमोरील बटन



दाबून महाविकास आघाडीच्या संजोग-वाघेरे यांना निवडून आणण्याचे आवाहन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून करण्यात आले. यावेळी शिरीष बुटाला, प्रितम म्हात्रे, शशिकांत बांदोडकर, भास्कर चव्हाण, प्रवीण जाधव, अच्युत मनोरे, अरुण ठाकूर, यशवंत भगत, राकेश टेमघरे, कुणाल कुरघोडे, सुजन मुसलोंडकर, सचिन रणदिवे, सनी टेमघरे, बापू जोशी, मयूर दसवते, अमर पटवर्धन, प्रशांत नरसाळे, संतोष तळेकर, निखिल भगत, कल्पना पाटील, प्रमिला कुरघोडे, अनुराधा ठोकळ,अर्चना कुळकर्णी, निर्मला म्हात्रे, उज्वला गावडे आदी उपस्थित होते.

## रामटेकवरून भाजपविरोधी खदखद

। नागपूर । प्रतिनिधी ।

रामटेक लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदाराला डावलून भाजपाने लादलेले उमेदवार देण्यात आल्याने शिवसेनेत खदखद असून मुख्यमंत्री शिंदे यांच्या समोर विद्यमान खा. कृपाल तुमाने यांनी तिला वाट मोकळी करून दिली. शिवसेना फुटल्यानंतर खा. तुमाने हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेले. परंतु, भाजपाने लोकसभा निवडणुकीत उमेदवार ठरवण्यावरून शिंदे यांच्यावर दबाव निर्माण केला. त्यामुळे ते खासदारांना देखील उमेदवारी देऊ शकत नव्हते .

शिंदे सेनेपुढे एकतर उमेदवार



बदलण्याचे किंवा भाजप ज्याचे नाव सुचवेल, त्याला उमेदवारी देणे हे दोनच पर्याय होते. त्यामुळे शिंदे सेनेत प्रचंड असंतोष निर्माण झाला. त्याचा प्रत्यय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नागपुरातील देशपांडे सभागृहात आयोजित शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात आला, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

तुमाने यांनी उमेदवारी नाकारल्याचे दु:ख व्यक्त करताना २०१९ ची निवडणूक आपण याच पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भरवशावर जिंकून दाखवली होती.

मात्र, यावेळी काही लोकांनी साहेबांना सांगितले की, तुमच्याकडे लोक नाहीत. संघटना नाही. तुमाने हे घरातच बसले आहेत. काँग्रेसचे केंद्रीय नेते मुकुल वासनिक यांना हरवून मी निवडून आलो होतो. आता तर स्पर्धाच नव्हती. मी एक लाखावर मतांनी निवडून आलो असतो, अशा शब्दात तुमाने यांनी भाजपाच्या दबावतंत्रावर नाराजी व्यक्त केली.

## शिंदे गटाच्या आमदारांची नाराजी

**मुंबई :** परभणी, उस्मानाबाद हे हक्काचे मतदारसंघ देऊन आपण युतीधर्म पाळला. पण आपला मित्रपक्ष युतीधर्म प्रामाणिकपणे पाळत नसल्याची तक्रार करतानाच ठाणे, नाशिक, रत्नागिरी सिंधुदुर्ग, संभाजीनगर, पालघर हे मतदारसंघ मित्रपक्षांसाठी अजिबात सोडू नयेत, अशी आग्रही भूमिका शिवसेनेच्या आमदारांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासमोर मांडली. ही निवडणूक प्रतिष्ठेची असल्याने युतीधर्म पाळा, मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांना बरोबर घ्या अशा सूचना शिंदे यांनी बैठकीत दिल्याचे समजते. हक्काचे मतदारसंघ भाजपला द्यावे लागले, काही ठिकाणी भाजपच्या दबावामुळे ऐनवेळी उमेदवार बदलावे लागले. काही मतदारसंघावर मित्रपक्षांनी केलेल्या दाव्यामुळे शिवसेनेत अस्वस्थता पसरली आहे.

## उमेदवाराकडे केवळ ५०० रुपयांची मालमत्ता

### देशातील दुसरा सर्वात गरीब

। नागपूर । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणूकीचे वारे वाहत असताना कुठल्या मतदारसंघात किती कोट्यावधीश उमेदवार आहे, कोणत्या उमेदवाराकडे किती कोटी रुपये आहेत ही चर्चा रंगली आहे. मात्र, दुसरीकडे या निवडणूकीत काही उमेदवार अत्यंत गरीब आहेत.

निवडणूक भरलेल्या नामांकनपत्राच्या आधारावरील लोकसभा निवडणूकीतील पहिल्या फेरीतील टॉप-१० गरीब उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये महाराष्ट्रातील रामटेक लोकसभा मतदारसंघातील उमेदवाराचाही समावेश आहे. रामटेक मतदारसंघातून उभे असलेले उमेदवार कार्तिक गेंदलाल डोके यांनी स्वत:कडे केवळ ५०० रुपयांची मालमत्ता असल्याचा दावा नामांकन पत्रात केला आहे. टॉप-१० गरीब उमेदवारांच्या यादीत कार्तिक डोके दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

४४ वर्षीय डोके हे विश्व हिंदू जनसत्ता पक्षाचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष असून अपक्ष म्हणून



निवडणूकीच्या रिंगणात उभे आहेत. देशात पहिल्या फेरीत त्यांच्यापेक्षा गरीब उमेदवार तमिळनाडूतील थूत्तुकुडी मतदारसंघातील आहे.

पोनराज के. नावाच्या या उमेदवाराकडे केवळ ३२० रुपयांची मालमत्ता आहे. स्वत:ला सामाजिक कार्यकर्ते असल्याचा दावा ते करतात.

स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये त्यांचे खाते असल्याची माहिती त्यांनी शपथपत्रात दिली, मात्र त्यात पैसे नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या नावावर एक मारुती अल्टो-८०० गाडी देखील आहे. मात्र रोख रक्कम केवळ ५०० रुपये आहे, असे डोके शपथपत्रात म्हणाले. त्यांच्या नावावर एकही गुन्हा दाखल नसल्याचा तसेच एकही न्यायालयीन प्रकरण नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## यवतमाळमध्ये १७ उमेदवार रिंगणात

। यवतमाळ । प्रतिनिधी ।

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात नामांकन अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी तीन अपक्ष उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे आता रिंगणात १७ उमेदवार कायम असून, येथे शिवसेना विरूद्ध शिवसेना अशीच थेट निवडणूक होईल.

निवडणुकीत महायुतीकडून रिंगणात असलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या राजश्री हेमंत पाटील महल्ले या बाजी मारतात की, आघाडीकडून ठाकरेगटाचे उमेदवार असलेले संजय देशमुख बाजीगर ठरतात, हे ४ जूनलाच स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीसाठी ३८ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीत १८ अर्ज बाद झाल्याने २० उमेदवार रिंगणात होते. यापैकी अपक्ष उमेदवार वैशाली संजय देशमुख, कुणाल जानकर आणि सवाई पवार यांनी आज नामांकन परत घेण्याच्या अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज मागे घेतले.

## शिंदेंच्या बालेकिल्ल्यात भाजपचे शक्तीप्रदर्शन

। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाण्यातील भाजपच्या नव्या भव्यदिव्य ठाणे जिल्हा विभागीय मुख्यालयाचे अनावरण मंगळवारी (दि.९) गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी भाजप शहरात जोरदार शक्तिप्रदर्शन करणार आहे.

एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ठाणे लोकसभा मतदारसंघावर भाजपने दावा ठोकलेला असताना आणि त्यासंबंधीचा तिढा सुटलेला



### ठाण्यावरचा दावा भक्कम करणार

नसताना भाजप ठाण्यात जोरदार शक्तीप्रदर्शन केले. ठाण्याचे ‘ठाणेदार’ आपणच असल्याचे अप्रत्यक्षरित्या सांगताना दिसेल.

ठाणे शहरातील पोखरण रोड क्रमांक एक येथे असलेल्या या कार्यालयाच्या सभोवतीचा परिसर आजपासूनच भाजपच्या झेंड्यांनी वेढला. कल्याण लोकसभेसाठी श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केल्याने, आता ठाणे लोकसभा मतदारसंघ हिसकाविण्यासाठी भाजप जोरदार तयारी करत आहे.

पडद्यामागे त्यासंबंधीची रणनीती आखण्यात येत आहे. त्याच रणनीतीचा भाग म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याणमधून श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी जाहीर करून ठाण्यात भाजपचा अप्रत्यक्षरीत्या दावा असल्याचे सांगितले.

## महायुतीच्या बैठकीत नाराजी नाट्य!

### बारणे यांचा प्रचार करणार नाही, आरपीआय गटाची भूमिका

। पिंपरी । प्रतिनिधी ।

पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित केलेल्या महायुतीच्या बैठकीत नाराजी नाट्य बघायला मिळालं. आरपीआय आठवले गटाच्या शहराध्यक्षाला व्यासपीठावर न बोलवल्याने आणि त्यांचा नामोल्लेख न केल्याने आरपीआय आठवले गटाने काढता पाय घेत पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. जोपर्यंत रामदास आठवले यांचा आदेश येत नाही. तोपर्यंत आम्ही श्रीरंग बारणे यांचा प्रचार करणार नाहीत, अशी भूमिका




आरपीआय गटाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी आज एक बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीसाठी अजित पवार, चंद्रकांत पाटील, उदय सामंत यांच्यासह शहराध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित आहेत. दरम्यान, या बैठकीदरम्यान नाराजी नाट्य बघायला मिळालं.

आरपीआय गटाचे शहराध्यक्ष यांचा नामोल्लेख आणि व्यासपीठावर बसण्यास न बोलावल्याने पदाधिकारी यांनी या बैठकीतून काढता पाय घेत नाराजी व्यक्त केली.

शेजारून जाणाऱ्या सामंत यांना या आरपीआय आठवले गटाच्या नाराजीची कुणकुण लागल्याने त्यांनी पदाधिकाऱ्यांची भेट घेतली आणि त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. सामंत यांनी मध्यस्थी करत उमेदवार श्रीरंग बारणे यांच्याशी शहराध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांची भेट घडवून या नाराजी नाट्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

## काँग्रेसला वंचितचा सात जागांवर पाठिंबा

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीचे जागा वाटप जाहीर झाले आहे. या जागा वाटपात समाजवादी पार्टी, माकप, शेकाप आणि इतर मित्र पक्षांना एकही जागा देण्यात आलेली नाही. तसेच प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीला कोणत्याही मतदारसंघात महाविकास आघाडी पाठिंबा देणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे दिसून येत आहे.

वंचित बहुजन आघाडीचे



नेते प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीची साथ सोडली. त्यापूर्वी त्यांनी काँग्रेसला सात जागांवर पाठिंबा दिला. तर शरद पवार गटाला बारामतीत पाठिंबा दिला आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांच्याविरोधात महाविकास आघाडी अकोल्यातून उमेदवार देणार नाही अशी चर्चा होती. परंतु काँग्रेसने अकोल्यातून उमेदवार दिला. त्यानंतर शरद पवार यांनी अजून वेळ गेलेली नाही. त्याबाबत चर्चा होईल, असं सूचक विधान केले होते. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांना अकोल्यात पाठिंबा देण्यासाठी शरद पवार काँग्रेसचे मन वळवतील असे सांगितले जात होते. पण मंगळवारी (दि.९) झालेल्या जागा वाटपात काँग्रेसने अकोल्यात आपला उमेदवार कायम ठेवला आहे. त्यामुळे अकोल्यात महाविकास आघाडी आंबेडकरांना टक्कर देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मीनाक्षी पाटील एक लढवय्या व्यक्तिमत्व



**मधुकर भावे**
ज्येष्ठ पत्रकार

मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेला आदरांजली वाहावी लागेल असे स्वप्नातही कधी वाटले नव्हते. महाराष्ट्रातील लढाऊ महिला कार्यकर्त्यांची यादी केली तर मुंबई-पुण्यातील मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी, पुण्यातील मालतीबाई तुळपुळे अशा मोजक्या लढाऊ महिला नेत्या सोडल्या तर ग्रामीण भागामध्ये आपल्या आजोबांचा, पित्याचा वारसा चालविणारे 'झाशीची राणी' म्हणजे मीनाक्षी पाटील. मीनाक्षीच्या मृत्यूची बातमी जेव्हा जोधपुरला समजली त्यावेळी तेथून अंत्यसंस्काराच्या वेळी पोहोचणे शक्य नव्हते. पण जोधपूरमध्ये राहणेही अस्वस्थ वाटले. एका लढाऊ घराण्याचा सारा कालखंड डोळ्यासमोर आला. लढ्याचा वारसा काय असतो हे आठवत राहिले. मीनाक्षीला हा लढाऊ वारसा मिळाला तो वडिलांकडून आणि आजोबांकडून, तसेच काका दत्ता पाटील यांच्याकडून. पण केवळ वारश्यावर मीनाक्षीने सामान्य माणसांसाठी लढविलेला लढा नव्हता. तिचे स्वत:चे एक व्यक्तिमत्त्व होते. वारसा मोठा होताच. अगदी आजोबा नारायण नागू पाटील यांच्यापासूनचा वारसा. रायगड जिल्ह्यात आता अशी लढाऊ माणसे होणार नाहीत. पत्रकारांमध्ये आता नारायण नागू पाटील किंवा प्रभाकर पाटील होणे नाही, त्याचप्रमाणे आता मीनाक्षी पाटीलही आता होणे नाही... मीनाक्षीच्या दु:खद मृत्यूची बातमी समजली आणि आप्पांचे लढे डोळ्यासमोर आले. आप्पा म्हणजे मीनाक्षीचे आजोबा नारायण नागू पाटील. १९४६ च्या विधानसभेतील आमदार 'कोकण कृषीवल' या साप्ताहिकाचे संस्थापक-संपादक पण केवळ पत्रकार नव्हे तर लढाऊ नेते. ते इतके आक्रमक होते की लोकमान्य टिळकांनी केसरीमध्ये अग्रलेख लिहिला होता. त्याचे शीर्षक होते, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' ५ मे १९५२ रोजी कोकण कृषीवलमधल्या अग्रलेखाचे शीर्षक होते, 'मुंबई सरकारला माणुसकी आहे का?' नारायण नागू पाटील यांनी शेतकऱ्यांच्या पाण्याचे प्रश्न, रस्त्याचे प्रश्न, कातकरी-ठाकूर-दलित यांचे प्रश्न लोकल बोर्डात असताना आप्पांनी बांधलेले त्यावेळचे साकव आज थक्क करतात. कोणतेही साधने नसताना लाकडी साकव बांधणे हे सोपे काम नव्हते. आज ज्याला उड्डाणपूल म्हणतात, त्यावेळी ते साकव होते. धाकटे शहापूर आणि मोठे शहापूर यामधला आप्पांनी बांधलेला पूल आजही अशक्यप्राय वाटतो. आप्पांचा हा वारसा प्रभाकर पाटील या त्यांच्या सुपुत्राने चालविला. राजकीय वारसाही चालविला आणि पत्रकारितेचाही वारसा चालविला. हाच वारसा मीनाक्षीने त्याच ताकदीने चालविला. कौटुंबिक सुखाला पारखी झालेली असतानाही व्यक्तिगत दु:खे सामाजिक दु:खात बुडवून टाकून मीनाक्षीने पदर खोचून जनतेचे प्रश्न लावून धरले. कॅन्सर या असाध्य रोगाने तिला गाठेपर्यंत शेवटच्या क्षणापर्यंत सामान्य माणसाच्या प्रश्नासाठी मीनाक्षी पाटील लढत राहिल्या. १३ सप्टेंबरला त्यांचा अमृतमहोत्सव साजरा झाला. ७५ वर्ष झालेली मीनाक्षी ही त्यादिवशी रोगाशी झुंजत असतानाही सामाजिक प्रश्नाबद्दल अस्वस्थ होती. त्यादिवशी तिला भेटता आले, तिचा सत्कार करता आला. तिच्याजवळ बसून चर्चा करताना सगळ्या लढ्यांची आठवण झाली. तिचे दादा म्हणजे प्रभाकर पाटील आणि मी तिचा काका म्हणजे मधूकाका. तिच्या बोलण्यात इतका प्रेमळपणा वाटायचा की, सामान्य माणसासाठी लढणारी मीनाक्षी आणि जुन्या आठवणीत रमलेली बेबी... दोन भिन्न रुपे होती पण कधीही थकली नाही. शरीराने नाही आणि मनानेही नाही. तीनवेळा आमदार, राज्यमंत्री असतानाही तिने मंत्रीपद कधी मिरवले नाही. तोरा दाखवला नाही. सर्व लढ्यात ती अग्रभागीच राहिली. रेवस बंदराचा लढा तिने अशा टोकाला नेला की... तिचे त्यावेळचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना मीनाक्षीने चक्क सांगितले की, 'विलासराव साहेब रेवस बंदर सुरू होणे अशक्य आहे. आता तातडीने प्रवाशांना मांडवा बंदर हवे आहे. जर मी 'बंदरे' (पोर्ट) खात्याची राज्यमंत्री असेन आणि मला हे काम करता येत नसेल, तर माझा राजीनामा द्या. विलासराव ऐकत राहिले. आणि तातडीने मांडवा बंदराच्या कामाला मंजुरी मिळाली. मीनाक्षीच्या तडफदारीने ते प्रभावित झाले. पेझारी येथील मीनाक्षीच्या घरी रात्री भोजनाला आले. जयंत पाटील यांनी पी.एन.पी.ची विशेष बोट आयोजित केली. त्यादिवशी मीनाक्षी पाटील त्यांना म्हणाल्या की, तुमच्या मनाच्या मोठेपणाबद्दल मी तुमची आभारी आहे. लढाऊपणा हा पाटील घराण्याचा वारसा आहे. आमदार दत्ता पाटील पाचवेळा अलिबाग मतदारसंघातून निवडून आले. १९८९ ला विरोधी पक्षनेते झाले. मीनाक्षीचे वडील प्रभाकर पाटील रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. पण सामान्य माणसांच्या प्रश्नांशी असलेली त्यांची नाळ कधीही तुटली नाही. मीनाक्षीची तीच भूमिका होती. राजकारणात असलेली मीनाक्षी तेवढीच प्रभावी पत्रकार होती. बिहारच्या जगन्नाथ मिश्रा सरकारने पत्रकारविरोधी काळा कायदा आणला. त्यावेळी पाटण्यात झाले नाही एवढे मोठे आंदोलन मीनाक्षीने लढविले. औरंगाबादच्या जेलमध्ये तिला ठेवण्यात आले. लोकमतचे त्यावेळचे संपादक जवाहरलाल दर्डा मीनाक्षीला तुरुंगात भेटायला गेले. तिला म्हणाले, 'तू झाशीची राणी आहेस.' मीनाक्षी खरंच झाशीची राणी होती. दारुबंदी विरोधात जर गावातील ५० टक्के महिलांनी दारूच्या दुकानांना विरोध केला तर ते दुकान बंद करावे लागेल, हा कायदा झाल्यावर रायगडमध्ये या वायद्याच्या आधारावर महिलांसाठी सगळ्यात मोठी चळवळ आणि संघटन मीनाक्षी पाटील यांनी उभे केले. त्यावेळचे महाडचे आमदार शाम सावंत यांच्या मालकीचे दारूचे दुकानही मीनाक्षीच्या आंदोलनामुळेच बंद झाले. विधानसभेत हा विषय मीनाक्षीने आणला. त्यावेळी मीनाक्षी राज्यमंत्री होती. त्यावेळचे दारूबंदी खात्याचे मंत्री प्रकाश मेहता यांना मीनाक्षीच्या मागणीप्रमाणे दुकान बंद करण्याचा निर्णय विधानसभेत जाहीर करावा लागला. मीनाक्षीकडे बंदरे आणि मत्स्य हे खाते होते. त्या खात्याच्या सचिव मालिनी शंकर यांनी मोठ्या भरतीमुळे उद्ध्वस्त होणाऱ्या गावांना संरक्षणासाठी मोठे बंधारे बांधायला विरोध केला होता. मीनाक्षीताईंनी त्यांना बोलाविले आणि सांगितले की, ङ्गतुम्ही सचिव आहात. मी मंत्री आहे. शेतकऱ्यांसाठी हा निर्णय करावाच लागेल.फ सचिवांनी विरोध कायम ठेवला. मीनाक्षीने फाईल उचलली, विलासरावांच्या समोर जाऊन बसली. रांजणखारला मोठा बंधारा बांधता की नाही... एकच प्रश्न विचारला. विलासरावांनी एका क्षणात फाईलवर सही करून निर्णय झाला. जे.एन.पी.टी.च्या लढ्यातही मीनाक्षी रस्त्यावर उतरली. तुरुंगवास भोगला. त्यावेळी बेबीचा मुलगा लहान होता. ती थोडीशी भावूक झाली होती. दत्ता पाटील तिला भेटायला तुरुंगात गेले होते. बेबीच्या डोळ्यातील पाणी बघून ते म्हणाले, 'बेबी, तू नारायण नागूंची नात आहेस, लोखंडाचे चणे खायचे असतात. हिंमत हरायची नाही. राजकारणात भावनेला जागा नाही.' बेबीने अश्रू आवरले. दत्ता पाटील यांनी ही गोष्ट प्रभाकर पाटील यांना सांगितली. प्रभाकर मीनाक्षीला भेटायला गेला. मीनाक्षीने लगेच ओळखले, ती म्हणाली, 'दादा तुम्ही का भेटायला आलात मला माहिती आहे. तुमची लेक हिंमत हारलेली नाही. पण मी 'आई' आहे हेही लक्षात ठेवा. त्या क्षणाला प्रभाकर पाटील यांचे डोळे भरून आले. राजकारणात वावरणाऱ्या आणि रस्त्यावर लढे लढणाऱ्या नेत्यांचे अश्रू म्हणजे पाण्यातल्या माशांचे अश्रू असतात. पण कधीतरी बांध फुटतोच. अशा या आमच्या लढाऊ मीनाक्षी पाटील यांच्या निधनानंतर पेझारीला त्यांच्या घरी गेले १३ दिवस सांत्वनासाठी भेटायला आलेल्या लोकांच्या गर्दीला बांध घालणे शक्य नाही. अश्रू आवरता येतील पण प्रेमाने येणाऱ्या माणसांचे लोंढे बेबीची लोकप्रियता सांगून जात होते. जयंत आणि पंडित पाटील या दोन बंधूंनी बेबीचा फार मोठा फोटो समोरच लावलाय. त्या फोटोला फुले वाहताना लागलेल्या रांगेतील अनेकांच्या डोळ्यात गुरुवारी पाणी वाहत होते. त्याचा अनुभव घेतला. मीनाक्षी पाटील गेल्या तरी जिद्द हरवून गेलेल्या नाहीत. आजही पाटील घराण्याची जिद्द सामान्य माणसांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर लढण्याचीच आहे. जयंत पाटील तर आता जाहीरपणे निवडणुकीत रस्त्यावर उतरलेलेच आहेत. बेबी आज असती तर या निवडणुकीत तिचाही तोच अवतार पाहायला मिळाला असता. जन्माला आलेल्या प्रत्येकाला एक दिवस जायचेच आहे. पण जाणारा मागे काय ठेवून जातो. बेबीने एकच ध्येय समोर ठेवून ती निघून गेली आहे. सामान्य माणसासाठी लढत राहा. तिच्या तेराव्या स्मृतिदिनाला अभिवादन करताना तिचा तोच आवेश आणि जिद्द या महाराष्ट्राला पुन्हा पुरोगामी विचारावर उभे करायला मदत करणार आहे. मीनाक्षी तुला मन:पूर्वक अभिवादन!

## उरणमध्ये दिवसाढवळ्या खारफुटीची कत्तल

**। उरण । वार्ताहर ।**

उरण परिसरात दिवसाढवळ्या कोणतीही परवानगी न घेता, प्रशासनाची भीती न बाळगता खुलेआम खारफुटीची कत्तल सुरू आहे. याबाबत कोणी तक्रार केली तर अधिकारी वर्ग कारवाई करण्याचे सोडून ते मिटवून टाका, असा उपदेशाचा फेस देऊन आपली कातडी वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे तक्रारदार सांगत आहेत.



उरणला सुंदर असा खाडी किनारा लाभला आहे. खाडी किनाऱ्यावरील जमीन हरितपट्टा म्हणून ओळखली जाते. या हरित पट्ट्यात बांधकामे करता येत नाहीत. या हरित पट्ट्यात कांदळवन अर्थात खारफुटीचे जंगल आहे. खारफुटीचे जंगल पूर संरक्षक म्हणून गणले जाते. यामुळे त्या जंगलांची कत्तल करण्यास न्यायालयाने मनाई केलेली आहे. मात्र, आता येथील भूमाफियांची नजर आता या मोकळ्या राहिलेल्या हरित पट्ट्यावर पडली आहे. मोकळ्या जागा नसल्याने नागरिकांच्या सोयीसाठी ,पर्यावरण संवर्धनासाठी हरितपट्टे विकसित करा, असे आवाहन केले जात आहे. मात्र, त्यांच्या आवाहनाला प्रशासनातील अधिकारीच दाद देत नाहीत. त्यामुळेच कायद्याचे उल्लंघन करून आजही मोठ्या प्रमाणात बेकायदा चाळी, इमारतींची बांधकामे सुरू आहेत.

दिवसाढवळ्या खाडी किनारी मातीचे भराव टाकून खाडी पात्र बुजविण्यात येत असताना देखील वन विभाग, महसूल विभाग आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड प्रशासनाने दुर्लक्ष चालविल्याने पर्यावरण प्रेमी नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

मोरा, करंजा, केगांव, आवरा, जेएनपीटी गावालगत सरळसरळ खारफुटीवर भराव करून टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या आहेत. याबाबत प्रशासनाकडे लेखी तक्रारी करूनही कोणतीच कारवाई होतासना दिसत नाही. केगांव परिसरातील समुद्रकिनारी खुलेआम खारफुटीची कत्तल सुरू आहे. याबाबत तेथील ग्रामस्थ व सरपंच यांनी महसूल विभागाला कळवूनही खारफुटीची कत्तल सुरू असल्याचे सांगितले आहे. जर कुंपणच शेत खात असेल तर दाद कुणाकडे मागायची, असा सवाल येथील जनतेकडून केला जात आहे.

## दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**पनवेल :** पलावा येथील कंपनीतून नावडे येथे घरी परतणाऱ्या तरुणाच्या स्कूटीला पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघात झाला. या अपघातात जखमी झाल्याने तरूणाला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. तळोजा पोलिसांनी या अपघाताप्रकरणी अज्ञात वाहनचालका विरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव शुभम म्हात्रे (२७) असे असून तो नावडे गावात कुटुंबासह रहात होता.

## पालिकेचे वीस दिवस आयुक्तांशिवाय




**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल पालिका आयुक्त गणेश देशमुख यांची १९ मार्च रोजी बदली झाल्यानंतर गेल्या २० दिवसांपासून पनवेल शहर महापालिकेचे आयुक्त तसेच प्रशासक ही पदे रिक्त आहेत. सार्वत्रिक निवडणुकीमुळे त्यांची बदली झालेली आहे.

देशमुख यांनी दोनवेळा पनवेल पालिकेची सेवा केली आहे. गणेश देशमुख यांचा पहिला कार्यकाळ १८ एप्रिल २०१८ ते २० मे २०२० पर्यंत होता. तर, दुसरा कार्यकाळ १ जुलै २०२१ ते १९ मार्च २०२४ असा होता.

गणेश देशमुख यांच्या बदलीनंतर अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ यांच्याकडे २० मार्चपासून आयुक्तपदाचा कार्यभार सोपवला आहे. रसाळ हे दुसऱ्यांदा पनवेल पालिकेवर प्रभारी आयुक्त म्हणून काम पाहत आहेत. राज्य सरकारने निवडणूक आयोगाशी सल्लामसलत करून लवकरात लवकर अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असे मत माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांनी व्यक्त केले आहे.

## नगरपालिकेतील भंगार विक्री

**उरण :** लोकसभा निवडणुक जाहीर झाल्याने आचारसंहिता लागू झाली आहे. परंतु, या आचारसंहिता काळात उरण नगरपालिकेमधील भंगार साहित्यांची विक्री करण्यात आली आहे. आचारसंहिता काळात नगरपालिकेमधील मोठ्या प्रमाणात भंगार जमा झाले होते. त्या भंगार साहित्यांची विक्री आचारसंहिता काळात करण्यात आली. त्यामुळे यामध्ये काहीतरी काळेबेरे असल्याचा संशय कर्मचारी दबक्या आवाजात करीत आहे. संबंधित भंगार खरेदी करणारा लेखी ऑर्डर असल्याचे सांगतो, परंतु दाखवीत नाही. तरी याची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## पे अँड पार्किंग सुरू

**नागोठणे :** नागोठणे एस.टी. स्थानकात विविध प्रकारच्या वाहन चालकांसाठी अधिकृत पे अँड पार्किंग सेवा सुरू करण्यात आली आहे. श्री आई जोगेश्वरी पे अँड पार्किंग या सेवेच्या उद्घाटनाचा छोटेखानी कार्यक्रम मंगळवारी (दि.९) करण्यात आला. या सेवेमुळे वाहन चालकांची वाहने माफक दरात सुरक्षित राहणार असल्याने नागोठणे शहर व आजूबाजूच्या परिसरातून नागोठण्यात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा व सहकार्य करावे, असे आवाहन पे अँड पार्किंग सेवेचे अधिकृत परवानाधारक विपुल हेंडे यांनी केले आहे.

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **विहिरी -** आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- **बोअरवेल-विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- **अकाऊंटंट पाहिजे-** जीएसटी बील व रिर्टनस्चा कमीत कमी २ वर्षे अनुभव असावा. प्रत्यक्ष भेटा. संपर्क ९६२३१११४६०. एम.जे. एन्टरप्रायजेस, ब्राह्मण आळी, अलिबाग.
- **अलिबाग व जवळच्या भागातील दर महिन्यास** ३०० नग सोललेले नारळ पाहिजेत. मोबाईल : ९८६७१११७०५
- **फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात** वापर केलेला नाही. असे दोन २ BHK फ्लॅटस त्वरीत विकणे आहेत. पहिल्या फ्लॅटची किंमत ७३ लाख व दुसऱ्या फ्लॅटची किंमत ८३ लाख संपर्क : ८६९८६८२१२१
- **भेरसे येथे ३० गुंठे जागा विकणे आहे व** वावे नाक्यावर जागा विकणे आहे. तसेच मुरूड बीचपासून १२ कि.मी. अंतरावर रोडटच १ एकर जागा विकणे आहे. मो. ८२०८२९०६६२/९३७०१२६२५
- **अलिबागमध्ये ब्राह्मण आळीत राम मंदिराजवळ पहिल्या मजल्यावर,** स्वतंत्र जिना असलेले दोन वाणिज्य गाळे (कार्पेट ५५० चौ. फुट व १५०० चौ. फुट) विकणे/भाड्याने देणे आहेत. (डॉक्टर्स/वकील/पतपेढी वगैरेसाठी उपयुक्त) संपर्क : ७२७६५९१३०२/९७६२३२५०७२
- **अलिबागपासून सुमारे दहा किलोमीटरवर वढाव** (खुर्द) येथे गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमीन बोअरवेल, मीटर व घरपरवानगीसहित विकणे आहे. संपर्क : ७२७६५९१३०२/९७६२३२५०७२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## औद्योगिकीकरणात 'काकस्पर्श' दुर्मिळ

**। रसायनी । वार्ताहर ।**

एक चांगल्याप्रकारे विकसीत झालेला औद्योगिक पट्टा म्हणून रसायनी परिसराचा उल्लेख केला जातो. या ठिकाणी उद्योगधंद्यांबरोबरच नागरिकरणातही झपाट्याने वाढ झाली खरी, मात्र पाताळगंगेचे पाणी आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगामधील समृध्द वनसंपदा धोक्यात आली असल्याचे येथे प्रकर्षाने जाणवू लागले आहे. एकेकाळी किलबिल करणारे पक्षांचे थवेच्या थवे आता गायब झाल्याचे दिसून येत आहेत. विधी, कार्यात ज्या पक्षांना स्थान देण्यात आलेले आहे, असे पक्षीही आता दिसेनासे झाले आहेत. रानटी पक्षी तर सोडाचं या परिसरात हमखास दिसणारे कावळेही गायब झाले आहेत.



वाढते औद्योगिकीकरण आणि जैविक विविधतेला पोहचलेला धोका रसायनी परिसरात पदोपदी दिसून येत आहे. रसायनीतील गुळसुंदे येथील यादवकालीन सिध्देश्वर मंदिरासमोरील वाहणाऱ्या पाताळगंगा नदीवर दशक्रिया विधी होत असतात. या ठिकाणी एका व्यक्तीच्या दशक्रिया विधीसाठी आलेली माणसे भाताच्या पिंडाला कावळ्याने स्पर्श करावा, या प्रतिक्षेत बसली होती. बराचवेळ होउनही कावळा काही पिंडाला स्पर्श करीत नव्हता. कावळे असतील तर ते येणार, परंतु नातेवाईक वाट पहात होते. बऱ्याच वेळानंतर कुठूनतरी एक कावळा येउन पिंडाला शिवतो आणि मग सर्वजण सुटकेचा नि:श्वास सोडतात.

## करमणुकीपासून रसिक वंचित

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिक परिसर असल्याने येथील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. बाजारपेठेचे मुख्य केंद्र असणाऱ्या मोहोपाडा शहरात श्री गणेश मंदिरासमोरील पटांगणात या अगोदर दर्जेदार नाटके होत असल्याने मोहोपाडा शहरातील सांस्कृतिक मेजवानी त्याकाळी जीवंत होती. नामवंत नटांची कला या माध्यमातून रसिकांना पहायला मिळत होती. आज ती पहायला मिळत नसल्याने रसायनीकरांत नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, रसायनीच्या वाढत्या नागरिकरणात करमणुकीसाठी एखादे सुसज्ज असे क्षेत्र उभारण्यात यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

## रेल्वे स्थानकाला समस्यांचा विळखा

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिकीकरणाने नटलेला परिसर असून येथे विविध उद्योगधंदे आहेत. परिसरात शासकीय कार्यालय, पिल्लई इंटरनॅशनल महाविद्यालय, आर्थव्यवस्थेचे प्रशिक्षण देणारा सेबी प्रकल्प तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आदिंमुळे रसायनी व परिसराचा नावलौकिक आहे. परंतू, येथील रसायनी रेल्वे स्थानक विविध समस्यांच्या गर्तेत असून स्थानकात योग्य सुविधा नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. या स्थानकावर दिवा-मुंबई, रत्नागिरी, गोव्याच्या दिशेने येणाऱ्या रेल्वे गाड्या थांबा घेतात. स्थानकावर निवारा शेड नसल्याने प्रवाशांना भर उन्हात तर, पावसाळयात भिजत गाडीची वाट पहावी लागते. शिवाय बसण्यासाठी स्थानकावर बाकड्यांचीही व्यवस्था नसल्याने ताटकळत उभे राहावे लागते. तसेच, पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था नसल्याने काही अंतरावर पायपीट करत जावे लागते. रेल्वे तिकीट घरही स्थानकापासून काही अंतरावर असून प्रवासी तिकीट घेऊन येईपर्यंत रेल्वे गाडी जाण्याची वेळ येते, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

## मोहाचीवाडी येथे अखंड ज्ञानयज्ञ सोहळा



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

देवाची भेटी ही केवळ धावपळ करून मिळणार नाही, तर मानाने देवाची पूजाअर्चा आणि आपले सर्वस्व अर्पण केल्याने होत असते. शारीरिक हालचाल आणि धावपळीने देव भेटीला येणार नाही, असे ठाम प्रतिपादन दिलीप राणे यांनी केले. मोहचीवाडी येथील अखंड ज्ञानयज्ञ सोहळ्यात काल्याचे कीर्तन सादर करताना ते बोलत होते.

ओम साई साईबाबा मंदिराच्या ३२व्या वर्धापन दिनानिमित्त साडेतीन दिवसाचे अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन केले होते. ६ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत साजऱ्या झालेल्या सोहळ्यात काल्याचे कीर्तन कर्जत येथील दिलीप राणे यांनी सादर केले. यावेळी काल्याचे कीर्तन सादर करताना राणे यांनी ३२ वर्षाची सेवा बजावणाऱ्या साईबाबा मंदिराच्या समितीच्या कार्यावर अभंग आपल्या कीर्तनासाठी घेतला होता. त्यावेळी त्यांनी आपल्या कीर्तनातून मार्गदर्शन करताना या मंडळाचे कार्यकर्ते हे गेली ३२ वर्षे सेवा बजावत असून आपल्याला काही मिळेल काय? या भावनेने त्यांनी कार्य केले नाही. कारण त्यांची हि धावपळ मंडळाच्या कार्यकारीणीमधील कार्यकर्त्यांनी केलेली मेहनत सत्कारणी लागणार, असा विश्वास केला.

## अती उष्णतेमुळे थंडपेयांना वाढती मागणी

### सरबतांच्या दरातही वाढ

**। तळा । वार्ताहर ।**

**वाढत्या उष्णतेमुळे शरीराला थंडावा देण्यासाठी तळा बाजारपेठेत नागरिकांची पाऊले थंड पेयांकडे वळली आहेत. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच उष्णतेचे प्रमाण वाढले असल्याने या उष्णतेपासून वाचण्यासाठी नागरिकांकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत.**

उष्णतेचे प्रमाण वाढू लागल्याने तसेच उन्हातून काम करताना थकलेल्या शरीराला थंडावा देण्यासाठी नागरिकांची पाऊले थंडपेयांच्या दुकानांकडे वळत आहेत. यासाठी बाजारपेठेत संत्री, मोसंबी, अननस, लिंबू सरबत, कोकम सरबत, उसाचा रस यांसारखे विविध थंडपेये विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी फळांच्या किंमतीत वाढ झाल्याने या थंड पेयांच्या किमतीत वाढ झाली आहे. यामुळे वाढलेल्या महागाईचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे.

**फळांच्या किंमतीत वाढ**

सरबतांच्या वाढलेल्या किमतीचे प्रमुख कारण म्हणजे फळांचे वाढलेले दर. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी फळांच्या दरामध्ये वाढ झाली आहे. ज्यामध्ये १६० रुपये किलो मिळणारे सफरचंद आता २०० रुपये किलो प्रमाणे मिळत आहेत. ६० रुपये किलो मिळणारे अननस आता १०० ते १२० रुपये किलोप्रमाणे मिळत आहे. यासह संत्री व मोसंबीच्या दरातही वाढ झाली असून ९० रुपये कलो मिळणारे संत्री व मोसंबी आता १२० रुपये किलो प्रमाणे मिळत आहेत. फळांच्या या वाढलेल्या दरामुळे बाजारपेठेत सरबतांच्या किंमतीही वाढल्या आहेत.



**सरबतांचे दर**

| गेल्यावर्षीचा दर | | दर-सध्याचा |
|---|---|---|
| संत्री- | ३० | ४० |
| मोसंबी- | ३० | ४० |
| सफरचंद- | ३० | ४० |
| अननस- | २५ | ३५ |
| ऊस- | १५ | २० |
| लिंबू- | २० | ३० |

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी सरबतांच्या किमतीत वाढ झाली आहे. लिंबूचे दर खूप वाढल्यामुळे लिंबू सरबतही महागले आहे. तसेच, सफरचंद, मोसंबी, संत्री, अननस या फळांच्या वाढलेल्या किमतींमुळे त्यांच्या सरबतांचे दर देखील वाढले आहेत. साधारणपणे १० ते १५ रुपयांची वाढ प्रत्येक सरबताच्या ग्लासमध्ये झालेली आहे.

- दत्ता साळुंखे, सरबत विक्रेते

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण

**उरण :** वहाळ येथील साई मंदिरात साई दर्शन भक्ती सोबत शक्तीचे दर्शन घडावे या उद्देशाने आज गुढीपाडव्याच्या शुभदिनी हिंदूंचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाहुती पुतळा मंदिर परिसरात बसविला. या पुतळ्याचे अनावरण आरटीओ सचिव विद्यासागर हिरमुखे व अन्न व औषध महाराष्ट्र सचिव संदीप पतंगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, नारायण घरत, काशिनाथ पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्या पार्वती पाटील, साई देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष रवी पाटील, बाळाराम पाटील, जगन पाटील, अनंत पाटील, मो.का.मढवी, शिरीष कडू, ह.भ.प. रामकृष्ण महाराज, सुदिन पाटील, सुशील पाटील, धनंजय घरत, माजी सरपंच अरुण दापोलकर, तैमूर पाटील आदी साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगावमध्ये भाताचे पीक घटले

## नादुरुस्त कालव्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, चाऱ्याचाही प्रश्न गंभीर

**। माणगाव । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा हा एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून डोळवहाळ बंधाऱ्यातील कालव्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. तर स्थानिक प्रशासनालादेखील या कालव्याची साफसफाई करण्यासाठी पुरेशी यंत्रसामग्री अणि शेवटच्या शेतीपर्यंत पाणी पोहचत नसल्याने उन्हाळी रब्बी हंगामातील पिकांचे क्षेत्र कमी होऊन भातपीक धोक्यात येत आहे. त्यामुळे माणगाव तालुक्यातील भातपिकाचे क्षेत्र दिवसेंदिवस घटल्याने शेतकऱ्यांमधून कमालीची चिंता व्यक्त होत आहे. शिवाय त्यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणावर चाऱ्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. काही तालुक्यांमध्ये सिंचनाची सुविधा असल्याने भातशेती बहरत आहेत.



### यंदा कडधान्याच्या पिकाला प्राधान्य

यंदाच्या वर्षी माणगाव तालुक्यात भातपिकाची लागवड १२० हेक्टर क्षेत्रावर करण्यात आली. यंदा भाताचे क्षेत्र कमी झाले असले तरी कडधान्याच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. चवळी, वाल, मूग, त्याचबरोबर काही शेतकऱ्यांनी तूर, उडीद, हरभरा, भुईमूग, तीळ तसेच भाजीपाल्याची लागवड केली आहे. तसेच शेती व्यावसायाला पूरक नगदी पीक म्हणून कलिंगड मोठ्या प्रमाणात पिकवले जात आहेत. मात्र, माणगावची भाताची ओळख पुसट होत असली तरी कडधान्य आणि कलिंगडाच्या विक्रमी उत्पादनातून ती ओळख गडद होत आहे. रब्बी भाताचे क्षेत्र वाढवण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

रब्बी हंगामातील शाश्वत पीक म्हणून भाताच्या पिकाकडे पाहिले जाते. मात्र, यंदाच्या वर्षी काळ प्रकल्पाच्या कालव्यामध्ये मुदतीत पाणी न सोडल्याने माणगाव तालुक्याला भाताचे कोठार म्हणून असलेली ओळख यंदाच्या वर्षी पुसट होत आहे.

| कडधान्य | हेक्टर |
| --- | --- |
| वाल | ७०० |
| मूग | ३५० |
| हरभरा | २०० |
| मटकी | १०० |

दिवसेंदिवस रब्बी हंगामातील भातपिकाचे क्षेत्र घटत आहे. ही रायगड जिल्ह्यासाठी चिंतेची बाब आहे. यंदाच्या वर्षी १२० हेक्टरवर भातलागवड करण्यात आली आहे. माणगाव तालुक्यातील उन्हाळी हंगामातील हजारो हेक्टर क्षेत्रातील रब्बी पिकाच्या उत्पादनात कमालीची घट झाली आहे. त्यामुळे यंदा भातपिकाच्या उत्पादनावर चांगलीच संक्रांत कोपली आहे. यंदाच्या वर्षी १,३५० हेक्टरवर कडधान्ये लावण्यात आली होती. कोकणातील मुख्य अन्न भात असून रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात यंदाच्या वर्षी १२० हेक्टर म्हणजेच ३०० एकरवर भातपीक लावणी होणार आहे. येथील कालव्यातील पाण्याच्या अभावी एक हजार हेक्टर क्षेत्र पडून आहे. गेल्या वर्षी हेक्टरी उत्पादन ४० क्विंटलप्रमाणे ४४ हजार ४०० क्विंटल सरासरी उत्पन्न शेतकऱ्यांना मिळाले होते. एकूण ९८ हेक्टर क्षेत्रावर भातपिकाच्या उत्पादनात घट होऊन ३८ क्विंटल उत्पादन मिळू शकले.

भात या मुख्य पिकाबरोबरच शेतकऱ्यांनी कडधान्याचे पीकही मोठ्या प्रमाणात घेतले आहे. तर कलिंगड ५०० हेक्टर, भाजीपाला १०० हेक्टरवर लागवड केली आहे. दरवर्षी १५ डिसेंबर रोजी कोकणातील हंगामी पिकासाठी काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगावमधील शेतीला सोडण्यात येते. यंदाच्या वर्षी हे पाणी ५ जानेवारीला कालव्याला दरवर्षीपेक्षा २० ते २५ दिवस उशिरा सोडल्यामुळे शेतकरी नाराज झाला होता.

## सांडपाण्याच्या खड्ड्यात पडून मुलाचा मृत्यू

**पनवेल :** बांधकाम व्यवसायिकाने इमारतीच्या सांडपाण्याच्या पाण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात बुडून एका मुलाचा मृत्यू झाल्याची घटना आकुर्ली येथे घडली आहे. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिसरी इयत्तेत शिकणारा करणकुमार अजय प्रसाद मेहतायाचे कुटुंबिय आकुर्ली गावात राहतात. करणकुमार खेळण्यासाठी मागे गेला होता. या ठिकाणी इमारतींचे काम सुरू आहे. या बांधकाम व्यवसायिकाने सांडपाण्याच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी अन्य जागेत मोठा खड्डा खोदला आहे. त्या खड्ड्यात बुडून करणकुमार याचा मृत्यू झाला.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक



ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## तर वंचितच्या उमेदवाराला पाठिंबा



**। पनवेल । वार्ताहर ।**

युती व आघाडीच्या नेत्यांनी संपर्क साधला नाही तर वंचितच्या उमेदवाराला पाठिंबा देण्यात येऊ शकतो असा निर्णय रायगड रत्नागिरी मावळ मतदार संघामध्ये महेश साळुंखे यांनी पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून घेतलेला आहे.

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक दिवंगत मनोज संसारे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महेश साळुंखे यांनी राजकीय भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, रायगड व मावळ मतदारसंघामध्ये स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाची ताकद आहे. आजपर्यंत महायुती किंवा महाविकास आघाडीने स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीशी संपर्क केलेला नाही.

## पेण, वडखळमध्ये पोलिसांचे संचलन

**पेण :** देशासह राज्यात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून रायगड मतदारसंघात ७ मे रोजी निवडणूक होत आहे. त्या अनुषंगाने आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे, या दृष्टिकोनातून पेण, वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत नुकतेच पोलिसांनी संचलन केले. निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याची दक्षता घेत नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखावी, असे आवाहन वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी केले आहे. पेण आणि वडखळ बाजारपेठ येथे पोलीस कर्मचाऱ्यांनी संचलन करून भयमुक्त वातावरणात निवडणूक पार पाडण्याचा संदेश दिला.

# मार्बलच्या देवघरांमुळे लाकडी मंदिरे काळाच्या पडद्याआड

**। रसायनी । वार्ताहर ।**



काही वर्षांपूर्वी देव बसविण्यासाठी लाकडी मंदिर असायचे शिवाय श्रीमंत व्यक्ती सागाच्या किंवा इतर लाकडाचे देवघर बनवित असत. शिवाय जुन्या घरांवर याअगोदर लाकडाच्याच छतावर कौले असायची; परंतु बदलत्या काळात घराचे रुपांतर बंगल्यामध्ये झाल्याने आणि घरामधील असलेल्या देवालय सध्या ग्रेनाईट मार्बलचे झाल्याने लाकडाची मंदिरे वापरण्याकडे नागरिकांचा कल कमी प्रमाणात दिसून येतो.

सद्यस्थितीला जंगलात लागणारे वणवे, लाकूडतोड यामुळे जंगले नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने शिवाय लाकडी मंदिरासाठी लागणारे लाकूड दुर्मिळ होत गेल्याने अनेकांनी मार्बल, ग्रेनाइटने सजवलेली मंदिरे घेण्याला पसंती दिसत असून अशा मंदिराकडे ग्राहकांचा खरेदी करण्याकडे कल दिसत आहे. प्रत्येकांची मानसिकता बदलत चालली आहे. यामुळे नवीन घर बांधले गेले कि त्या जागी मार्बलचे देवघर बनविण्यासाठी लाकडी मंदिराला कमी मागणी असल्याचे दिसत आहे. यामुळे ग्रामीण भागात सुताराचे काम करणारे उत्तम कारागीरांवर बेकारीची कुऱ्हाड आल्याचे दिसून येते. मार्बलचे मंदिर दिसण्यास सुरेख आणि उत्तम कलाकुसरांनी सजलेले असते. लाकडी मंदिर आता काळाच्या पडद्याआड होत असल्याने ग्रामीण भागात लाकडावर कोरीव काम करणाऱ्या सुतार कामगारांना काम मिळणे मुश्किल झाले आहे.

### शुद्धीपत्रक

मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
| --- | --- | --- |
| १३६/१/ब/४ | ०२-०२-०० | ०.६९ |

या मिळकतींचे मालक गुलाबचंद शामजी हरीया हे आहेत यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविलेले त्याकरीता दिनांक ०५ एप्रिल २०२४ रोजी कृषिवल या वृत्तपत्रांत जाहीर पेपर नोटीस देणेंत आलेली होती, दिनांक ०५ एप्रिल २०२४ रोजीच्या पेपर नोटीसमध्ये सर्व्हे नंबर ३६/१/ब/४ असा चुकीचा लिहीणेंत आलेला होता, त्या ठिकाणी सर्व्हे नंबर १३६/१/ब/४ हा योग्य व बरोबर असुन, नोटीशीच्या वर्णनामध्ये सर्व्हे नंबर ३६/१/ब/४ असा वाचणेंत यावा.

दिनांक :-१० एप्रिल २०२४

**ॲड.शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि.
कोतवालनगर कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१ मो. नं. ९५२७२८२५२५

## आचारसंहिता काळात निसर्ग नष्ट करण्याचा प्रयत्न

**। उरण । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली असून पर्यावरण संरक्षणाशी संबंधित अधिकाऱ्यांना लोकसभा निवडणुकीच्या कामावर नेमण्यात आले आहे. याचा गैरफायदा घेत समाजकंटक आणि हितसंबंध असणाऱ्यांनी निसर्गावर हल्ले सुरू केले आहेत. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांना निवडणूक कर्तव्यापासून वगळण्याची विनंती पर्यावरणावर केंद्रित असलेल्या गटांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

निसर्ग संवर्धनाचे कार्य करणाऱ्या या मोहिमेचे नेतृत्व नॅटकनेक्ट फाऊंडेशन करीत आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत निवडणूक आयोगाला पर्यवरणवाद्यांनी उरणमधील अनेक पाणथळ जागा आणि खारफुटीचे भाग नष्ट केल्याच्या तक्रारी केल्या होत्या. त्याची तपासणी अधिकारी करू शकले नाहीत. याचे मुख्य कारण संबंधित अधिकारी निवडणूक कर्तव्यावर होते असे सांगण्यात आले होते.

या संदर्भात नॅटकनेक्टचे संचालक कुमार यांनी एप्रिल २०१९ मध्ये हा मुद्दा निवडणूक आयोगासमोर उपस्थित केला होता. याची दखल घेत संबधीत अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली आहे. तसेच प्रतिसाद देण्याचे स्पष्ट केले होते.

सध्या खाडीतील पाण्याचे प्रवाह अडविले जात आहेत. त्यामुळे पाणजे येथील २८९ हेक्टर आंतर-भरतीची ओलसर जमीन पूर्णपणे कोरडी झाली आहे. त्याचप्रमाणे नेरुळ येथील डीपीएस फ्लेमिंगो तलावाबाबतही अशीच स्थिती आहे. ३० एकरचा तलाव जवळपास कोरडा पडला आहे, असे बी. एन. कुमार यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे खारघर, उलवे आणि उरण सारख्या किनारपट्टीवर खारफुटीचा नाश आणि जमीन बळकावण्याचे प्रकार सातत्याने होत आहेत. असे सागर शक्तीचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी सांगितले.

## जेएनपीटीच्या कामगार नेत्यांची निर्दोष मुक्तता

**उरण :** जेएनपीटी वर्कर्स युनियनतर्फे कामगारांच्या विविध मागण्या संदर्भात प्रशासनाच्या विरोधात लाक्षणिक उपोषण केले होते. त्या संदर्भात युनियनच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. त्या गुन्ह्यांमधून उरण न्यायालयाने रविंद्र पाटील, सुरेश पाटील, बी.के.ठाकूर, प्रकाश नाचरे, जे.के.भोईर आणि मंगेश ठाकूर या सर्वांची निर्दोष मुक्तता केली आहे.कामगारांसाठी लाक्षणिक उपोषण केल्याचा राग धरून प्रशासनाने गुन्हे दाखल केले होते.संघटनेच्या वतीने ॲड. रत्नदीप पाटील, अमर पाटील यांनी कामगारांची बाजू मांडली.

## तोतया पोलीस गजाआड; ४ गुन्हे उघडकीस

**। पनवेल । वार्ताहर ।**

पोलीस असल्याची बतावणी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे. सुमित्रा रामचंद्र सोनगार हीस एका इसमाने पोलीस असल्याचे बतावणी करून तसेच जवळच एका घरात घरफोडी झालेली असून सदर गुन्ह्यातला मुद्देमाल तपासायचा आहे. तुमचे सोने दाखवा असे सांगून त्यांचे सोने बतावणी करून घेऊन गेला. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पनवेल तालुका पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासणी करून त्याचबरोबर जेल रिलीज यातील आरोपी यांची माहिती घेऊन त्याचे तांत्रिक विश्लेषण करून सदर गुन्ह्यांमध्ये विशाल बाळासाहेब सगलगीले यास ताब्यात घेतले आहे. सदर आरोपी याच्याकडे चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले आहेत. सदर आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, पोलिसांचा गणवेश जप्त केला असून त्याच्यावर यापूर्वी खारघर, तळोजा, एनआरआय व पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन:-**

**१) मौजे - सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर.-पॉ. | आकार | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | रुपये | पैसे |
| शोहेब हाजी अहाद दरवेश | ८ | ४ ब | ०-५१-०० पैकी ०-२६-५० | ० | ३७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता: फ्लॅट नं. ४, ए विंग,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : १०/०४/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## ऐनघरच्या उपसरपंचपदी भगवान शिद यांची बिनविरोध निवड



**। नागोठणे । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील सर्वात श्रीमंत ग्रामपंचायत अशी ओळख असलेल्या ऐनघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी प्रभाग क्र. ४ मधील वाघ्रणवाडी गावातील सदस्य भगवान तानू शिद यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या निवडीनंतर शिवसेना(उबाठा) नेते व जिल्हा सहसंपर्क प्रमुख किशोर जैन व विभाग प्रमुख संजय भोसले यांनी ऐनघर ग्रामपंचायत कार्यालयात येऊन नवनिर्वाचित उपसरपंच भगवान शिद यांचे अभिनंदन केले.

उपसरपंच निवडीच्या वेळी सरपंच कलावती कोकळे, माजी उपसरपंच किशोर नावले, ग्रामसेवक गोविंद शिद, सदस्य मनोहरभाई सुटे, प्रकाश डोबळे, विनोद निरगुडे, सविता धामणसे, वैदेही इंदुलकर, नथीबाई कोकळे, पल्लवी भोईर, सुवर्णा शिद, कल्याणी मोहिते, अर्चना भोसले, प्रजवली भोईर, जितेंद्र धामणसे, रोहिदास लाड, संतोष लाड, सचिन भोईर, राजू कोकळे, सुरेश वाघमारे, जानू वारगुडे, दामोदर शिद, यशवंत शिद, रामा शिद, ताया शिद, यशवंत हंबीर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान याआधीचे उपसरपंच किशोर नावले यांनी पक्षांतर्गत तडजोडीनुसार आपला कार्यकाळ पूर्ण करुन आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी ही निवडणूक घेण्यात आली. सरपंच कलावती कोकळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच निवडीसाठी घेण्यात आलेल्या बैठकीत उपसरपंच पदासाठी भगवान शिद यांचा एकमेव अर्ज आल्याने भगवान शिद यांची बिनविरोध निवड झाली.

## कार्यकारिणी जाहीर

**उरण :** गुढीपाडव्याच्या शुभदिनी परंपरेनुसार बोकडवीरा गावातील गणेश मंदिर येथे पंचांग वचन व ग्रामसुधारणा मंडळाची नवीन कार्यकारिणी निवड संदर्भात ग्रामस्थांची बैठक संपन्न झाली. उरण पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी यांच्या समक्ष नवीन बोकडविरा ग्रामसुधारणा मंडळाची कार्यकारिणीची निवड करण्यात आली. कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी सूर्यकांत पाटील, सचिवपदी श्रीकांत पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्याचबरोबर कार्यकारिणीची निवड बिनविरोध करण्यात आली.

## जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या जडणघडणीत मीनाक्षीताईंचे मोलाचे योगदान

**। गडब ।वार्ताहर ।**




महाराष्ट्र राज्याच्या माजी राज्यमंत्री मिनाक्षी पाटील यांचे नुकतेच निधन झाले त्याच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने शोकसभेचे आयोजन ना.ना. पाटील हायस्कुल पेझारी येथे करण्यात आले होते.

यावेळी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सदस्य गजानन मोकल, लक्ष्मण गांवड, संजय मोकल, मिलिंद पाटील, जनार्दन पाटील, उल्हास पाटील,प्रथमेश पाटील, सुमित माने, कुंदन पाटील, अजिक्य पाटील आदिसह कबड्डी पंच खेळांडु उपस्थित होते.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या जडणघडणीत मीनाक्षी पाटील यांचे मोलाचे योगदान होते. जिल्ह्यात होणाऱ्या कबड्डी स्पर्धांना मीनाक्षी पाटील आवर्जून भेट देत व त्या खेळांडुना व आयोजकांना प्रोत्साहीत करीत. शेतकरी कामगार पक्षाच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या जाण्याने रायगड पोरका झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अशोक अनंता बांगर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-जांमरुंग, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
| --- | --- | --- |
| १३८/५ | १-०९-०० हे आर पॉ | ०-६६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १०/०४/२०२४
मोबा. ९८२२६९११०९

**ॲड. निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा
बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत,जि. रायगड ४१०२०१

# मिरज-श्रीवर्धन एसटीला गोंडघरजवळ अपघात

## जुन्या गाड्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**बोर्लीपंचतन । मकरंद जाधव**

मिरज-श्रीवर्धन एस.टी. बसचा गोंडघरगावाजवळ अपघात झाल्याची घटना घडली. श्रीवर्धन आगाराची एसटी सकाळी पावणेसात वाजता मिरजहून सुटून श्रीवर्धनकडे येत असताना गोंडघर गावानजीक गाडीचा पाटा तुटल्याने चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटून गाडी रस्ता सोडून खाली कलंडली. गाडीमध्ये ३४ प्रवासी होते. दिघी सागरी पोलीसांनी घटनास्थळी जाऊन प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्याबरोबरच अपघातग्रस्त प्रवाशांना उपचारासाठी योग्य ती मदत केली. गाडीच्या चालकासहीत किरकोळ जखमी झालेल्या १६ प्रवाशांवर बोर्लीपंचतन प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले.तर काही जखमींना पुढील उपचारासाठी श्रीवर्धन ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. सुदैवाने या अपघातात जीवित हानी झाली नसली तरी ही गाडी ज्या मार्गावरून आली त्या मार्गावरच्या महाबळेश्वर किंवा घोणसे घाटात हा अपघात झाला असता तर फार मोठी जीवितहानी झाली असती. श्रीवर्धन आगारासाठी त्वरित नवीन गाड्या उपलब्ध करून द्याव्या अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.



**निवडक**

## परकेपणाची वागणूक

**नवी दिल्ली :** भारतीय ऑलिम्पिक संघटनेतील अंतर्गत वादाची आता खुली चर्चा होऊ लागली आहे. कार्यकारी परिषदेचे सदस्य उघडपणे अध्यक्षांविरुद्ध कारवाया करत आहेत. अशा वेळी उद्विग्न झालेल्या अध्यक्ष पी.टी. उषा यांनी कार्यकारी परिषदेचे सदस्य मला कामच करू देत नसून प्रत्येक निर्णयात मला बाजूला ठेवण्याकडेच कल असतो, अशी खंत व्यक्त केली आहे. गेल्याच आठवड्यात कार्यकारी परिषदेच्या सदस्यांनी अनधिकृत व्यक्तींना प्रवेश बंदी अशी नोटीस परस्पर काढल्याने हा वाद समोर आला.

## धोनीचा मोलाचा सल्ला

**नवी दिल्ली :** आयपीएलचा २२ वा सामना चेन्नई आणि कोलकाता या दोन संघांमध्ये खेळला गेला. या सामन्यानंतर महेंद्रसिंग धोनीने अफगाणिस्तानच्या रहमानुल्लाह गुरबाज याला ऑटोग्राफ दिला आहे. गुरबाजने आपल्या अधिकृत ट्विटर आकाऊंटवरुन धोनीसोबतचा फोटो शेअर करत म्हंटल आहे की, भूतकाळाची चिंता करणे बंद करा, भविष्याचा विचार करणे थांबवा, फक्त हा क्षण जगा आणि आनंदित रहा, एमएस.' त्याच्या या पोस्टवर चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया दिल्या आहेत.

## तुषार देशपांडेचा खुलासा

**चेन्नई :** चेन्नई व कोलकाता विरुद्धच्या सामन्यानंतर एक व्हिडिओ तुफान व्हायरल झाला होता. व्हिडिओमागील खरी कहाणी तुषार देशपांडेने सांगितली आहे. या व्हिडिओमध्ये दिसते की, १३८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईला ३ धावांची गरज असताना धोनी पायऱ्यांवरून खाली येण्यापूर्वी रविंद्र जडेजाने बॅटवैगरे घेऊन मैदानात फलंदाजीला जात असल्याचे नाटक केले. तो काही पावले पुढे गेला आणि लगेचच मागे फिरला, त्यानंतर धोनी ड्रेसिंग रुममधून खाली आला आणि मैदानात फलंदाजीसाठी गेला.

## शेफर्डचे पोलार्डला श्रेय

**मुंबई :** कोणताही मागचा-पुढचा विचार न करता बिनधास्त फलंदाजी कर, असा सल्ला मला फलंदाजीचे प्रशिक्षक कायरन पोलार्ड यांनी दिला होता आणि मी क्षणाचाही विलंब न लावता प्रत्येक चेंडू सत्कारणी लावला, असे मत मुंबई इंडियन्सच्या रोमारिओ शेफर्डने व्यक्त केले. तब्बल ३९०च्या स्टाईक रेटने फटकेबाजी करणाऱ्या रोमारिओसाठी आयपीएल नवीन नाही. २०२२ मध्ये हैदराबाद संघाने घेतले होते. २०२३ मध्ये तो लखनौ संघात होता.

## लखनऊला मोठा धक्का

**नवी दिल्ली :** मयंक यादवला गुजरात विरुद्धच्या सामन्यात दुखापत झाली होती. त्यामुळे तो फक्त १ ओव्हर टाकू शकला होता. मात्र, त्याची दुखापत किती गंभीर आहे? तो लखनऊच्या आगामी सामन्यात खेळणार की नाही? याबाबत माहिती समोर आली नव्हती. अशातच आता मयंकच्या दुखापतीबाबत मोठी अपडेट आली आहे. बिश्त यांनी सांगितले की, मयंक पुढील सामन्यातून बाहेर पडू शकतो. मयंकच्या पोटाच्या खालच्या भागात दुखत आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून त्याला खेळवण्याती रिस्क घेतली जाणार नाही.

# टी-२० विश्वचषकाची तयारी
# खेळाडूंच्या कामगिरीवर लक्ष

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघ आणखी एका आयसीसी चषकात खेळणार आहे. गेल्या ११ वर्षातील आयसीसी चषकांचा दुष्काळ दूर करण्याची आणखी एक संधी आहे.

विश्वचषक स्पर्धा अमेरिका आणि वेस्ट इंडिज येथे होणार असून यासाठी खेळाडूंची पारख केली जात आहे. रोहित शर्मा कर्णधार असणार आहे. तर, विराट कोहलीची सध्याचा फॉर्म पाहता संघात निवड होणार यात शंका नाही. असे असताना माजी क्रिकेटपटू वेंकटेश प्रसाद यांच्या ट्वीटने खळबळ उडाली आहे. वेंकटेश प्रसादने तीन नावांची शिफारस निवड समितीकडे केली आहे. प्रसादने एक्सवर लिहिलं आहे की, 'शिवम दुबे स्पिनर्सविरुद्ध मोठे शॉट्स खेळण्यासाठी, सूर्यकुमार यादव सर्वोत्तम टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाज आणि रिंकू सिंह फिनिशिंगसाठी संघात असायला हवा. टी-२० विश्वचषकात प्लेइंग इलेव्हनमध्ये सहभागी केले तर एकदम मस्त होईल.'

## वेंकटेश प्रसादचे ट्वीट चर्चेत

वेंकटेश प्रसादचं ट्वीट इथपर्यंत ठीक होतं. पण त्यानंतर लिहिलेल्यचा वाक्यांचा अर्थ वेगळाच निघत आहे. सोशल मीडियावर जो तो आपल्या पद्धतीने अंदाज बांधत आहे. संघात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या उपस्थितीमुळे पाच जागा होतील. त्यानंतर फक्त यष्टीरक्षक फलंदाजासाठी जागा उरणार आहे. आता यातून काय बाहेर येतं हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे. वेंकटेश प्रसादच्या या ट्वीटचा अर्थ अष्टपैलू हार्दिक पांड्याला संघात स्थान मिळणं कठीण आहे असा होतो.



वनडे वर्ल्डकप स्पर्धेत हार्दिक पांड्याला दुखापत झाली होती. त्यानंतर साखळी फेरीतच स्पर्धेतून बाहेर गेला होता. त्यानंतर ट्रेड विंडोच्या माध्यमातून मुंबई इंडियन्समध्ये आला आणि त्याला कर्णधारपद सोपवलं गेलं. वनडे वर्ल्डकप स्पर्धेनंतर हार्दिक पांड्या थेट आयपीएल स्पर्धेत उतरला. पण त्याच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. आतापर्यंत खेळलेल्या चार सामन्यापैकी तीन सामन्यात पराभवाचं तोंड पाहिलं आहे. त्यात त्याची कामगिरी हवी तशी नाही. त्यामुळे हार्दिक पांड्याची निवड होते की नाही, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

दुसरीकडे, शिवम दुबेने चेन्नई सुपर किंग्ससाठी १६०च्या स्ट्राईक रेटने १७६ धावा केल्या आहेत. एक दमदार अर्धशतक झळकावलं आहे. तर फिरकीपटूंना झोपटण्याचा त्याचा हातखंडा आहे. त्यामुळे वेंकटेश प्रसादने दिलेले पर्याय निवड समिती कशी हाताळते याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागून आहे. विश्वचषकासाठी संघ निवडीची अंतिम तारीख १ मे आहे. तर संघामध्ये फक्त एकच बदल करण्याची संधी २५ मे पर्यंत असेल.

# न्यूझीलंडविरूद्ध पाकिस्तान संघ जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

१८ एप्रिलपासून पाकिस्तानच्या धरतीवर न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यात टी-२० मालिका खेळवली जात आहे. टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने ही मालिका दोन्हीही संघांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. येत्या जूनमध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेच्या धरतीवर विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. भारतात आयपीएल सुरू असल्याने किवी संघातील वरिष्ठ खेळाडूंनी पाकिस्तान दौऱ्याकडे कानाडोळा केला आहे. न्यूझीलंडचा संघ आधीच जाहीर झाला होता, तर मंगळवारी पाकिस्तानी संघाची घोषणा करण्यात आली.

फिक्सिंगमुळे बंदी घालण्यात आलेला मोहम्मद आमिर आगामी मालिकेत दिसणार आहे. अलीकडेच इमाद वसिम आणि मोहम्मद आमिर यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतत असल्याचे जाहीर केले. दोघांनीही पाकिस्तानी संघाचा विद्यमान कर्णधार बाबर आझमवर सडकून टीका केली होती. पण, आता हे दोघेही बाबरच्या नेतृत्वात खेळताना दिसणार आहेत. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने निवडसमिती बरखास्त करून नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. ही टी-२० मालिका १८, २० व २१ एप्रिल रोजी रावळपिंडी तर, २५ व २७ रोजी लाहोर येथे होणार आहे.



### पाकिस्तानचा संघ

बाबर आझम (कर्णधार), अबरार अहमद, आझम खान, फखर झमान, इफ्तिखार अहमद, इमाद वसीम, मोहम्मद अब्बास आफ्रिदी, मोहम्मद रिझवान, मोहम्मद आमिर, मोहम्मद इरफान खान, नसीम शाह, सैम अयुब, शादाब खान, शाहीन शाह आफ्रिदी, उसामा मीर, उस्मान खान, झमान खान, राखीव खेळाडू- हसीबुल्लाह, मोहम्मद वसीम ज्युनिअर, शाहिबजादा फरहान आणि सलमान अली अघा.

### न्यूझीलंडचा संघ


मायकेल ब्रेसव्हेल (कर्णधार), फिन अलेन, मार्क चॅपमन, जोश क्लार्कसन, जॅकोब डफी, डिन फॉक्सक्रॉफ्ट, बेन लिस्टर, कोल मॅककॉनची, ॲडम मिल्ने, जिमी नीशम, विल ओफरुर्के, टीम रॉबिन्सन, बेन सर्स, टीम सेफर्ट, इश सोधी.

# आम्ही ओल्ड, पण गोल्ड...

## जोकोविच-बोपन्नाचा जगाला इशारा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वय हा फक्त आकडा आहे, सातत्य असेल, तर यश मिळवता येते, हे दोन टेनिसपटूंनी गेल्या काही वर्षात दाखवून दिले आहे. हे दोन टेनिसपटू म्हणजे सार्बियाचा नोवाक जोकोविच आणि भारताचा रोहन बोपन्ना. या दोन्ही दिग्गज टेनिसपटूंच्या नावावर सध्या एक मोठा विश्वविक्रम आहे. ३६ वर्षीय जोकोविच नुकताच रॉजर फेडररला मागे टाकत जागतिक क्रमवारीत एकेरीमध्ये अव्वल क्रमांक पटकावणारा सर्वात वयस्कर टेनिसपटू ठरला आहे. तसेच, ४४ वर्षीय रोहन बोपन्नाही



सध्या जागतिक क्रमवारीत दुहेरीमध्ये अव्वल क्रमांकावर आहे. तोही दुहेरीत अव्वल क्रमांक मिळवणारा सर्वात वयस्कर टेनिसपटू आहे. याच विक्रमाबद्दल आता जोकोविच आणि बोपन्ना यांनी एकत्र येत प्रतिक्रिया देत जोकोविच गमतीने म्हटले की, यात समतोल नाही, हे अर्धे-अर्धे सुद्धा नाही. आमचे मिळून वय ८० आहे. पण मला वाटते आम्ही अजूनही भक्कम आहोत. याशिवाय बोपन्ना त्यांच्या खेळाबद्दल म्हणाला की, आता त्यांचा अनुभव कामाला येत आहे, तर जोकोविच म्हणाला, फक्त अनुभवच नाही, अजूनही खेळाबद्दल असलेले समर्पणही पुढे जाण्याची प्रेरणा देते. तो असंही म्हणाला की, तो बोपन्नाला तासनतास जीममध्ये पाहिले आहे आणि आता तो पूर्वीपेक्षाही अधिक वेळ फिट राहण्यासाठी फिजिओबरोबर असतो. शेवटी जोकोविच म्हणाला, आम्ही ओल्ड आहोत, पण गोल्ड आहोत. आमच्याकडे अजून खूप वेळ आहे.

## बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील पंचशील बौद्धजन समाज गोरेगाव व देशपांडे चेस ॲकॅडमी यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त माणगाव तालुकास्तरीय भव्य बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन गुरुवारी (दि.११) बुद्धविहार गोरेगाव येथे करण्यात आले आहे. या स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथी व इयत्ता पाचवी ते दहावी अशा दोन गटात घेण्यात येणार असून दोन्ही गटासाठी प्रवेश फी २०० रुपये ठेवण्यात आली आहे. तरी या स्पर्धेत तालुक्यातील जास्तीतजास्त स्पर्धकांनी सहभाग घेण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेची वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंत असून दोन्ही गटासाठी एक ते सात क्रमांक व इतर वैयक्तिक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी संदीप साळवी ९७६४६२३१३१ व किशोर देशपांडे ८८८८२५०२३४ यांच्याकडे संपर्क साधावा.

## पंतसह 'या' खेळाडूंचा समावेश निश्चित

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमिअर लीग २०२४ नंतर लगेच अमेरिका आणि वेस्ट इंडिज येथे २ जूनपासून टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळवली जाणार आहे. या स्पर्धेसाठी संघ निवड करण्यापूर्वी इंडियन प्रीमिअर लीग २०२४ मधील खेळाडूंच्या कामगिरीवर भारतीय निवड समिती लक्ष ठेवून आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रिषभ पंतचे टी-२० संघातील स्थान जवळपास पक्के झाले आहे. त्याने आतापर्यंत चांगली कामगिरी करून दाखवली आहे आणि निवड समिती त्याच्यावर लक्ष ठेवून आहे. त्याच्या फिटनेसवरही लक्ष ठेवले जाईल.

विश्वचषक स्पर्धेसाठीचा संघ निवडण्यासाठी निवड समिती एप्रिलच्या शेवटच्या किंवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बैठक घेण्याचे वृत्त समोर येत आहे. आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाचा अंदाज बऱ्यापैकी अपेक्षित आहे. दरम्यान, विराट कोहलीच्या उपस्थितीबाबत बरीच चर्चा सुरू आहे.

पण, आयपीएल २०२४ मधील त्याचा फॉर्म पाहता निवड समिती त्याच्याकडे दुलर्क्ष करतील असे वाटत नाही. त्याने एका शतकासह ३०० धावा केल्या आहेत. तसेच, विश्वचषक स्पर्धेत रोहित शर्मा व यशस्वी जैस्वाल यांचे सलामीचे स्थान पक्के असताना विराट तिसऱ्या क्रमांकावर खेळेल. पण, त्यामुळे शुबमन गिलच्या समावेशावर प्रश्नचिन्ह उरतोय.

युझवेंद्र चहलसमोर कुलदीप यादव व अक्षर पटेल यांचे आवाहन आहे. सूर्यकुमार यादव, रिंकू सिंग, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि अर्शदीप सिंग यांचाही समावेश निश्चित आहे.

## सीएसकेची दादागिरी

**चेन्नई :** सोमवारी चेन्नई सुपर किंग्सने आयपीएल स्पर्धेतील २२ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध ७ विकेट्सने विजय मिळवला. हा चेन्नईचा या स्पर्धेतील पाच सामन्यांतील तिसरा विजय होता. दरम्यान, असे असले तरी एमए चिदंबरम (चेपॉक) स्टेडियवर झालेल्या या सान्यादरम्यानचा सध्या एक वाद समोर आला आहे.

सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये कोलकाता संघाच्या चाहत्यांना चेपॉक स्टेडियमवर पोस्टर्स नेण्यापासून रोखले जात असल्याचे दिसत आहे. चाहत्यांनी केलेल्या दाव्यानुसार कोलकाता संघाला पाठिंबा देण्यासाठी आणलेल्या पोस्टर्सला चेपॉक स्टेडियममध्ये नेण्याची परवानगी स्टेडियम कर्मचाऱ्यांनी दिली नाही. त्यामुळे स्टेडियमबाहेर चाहत्यांकडून आक्रोशही करण्यात आला.

# मायकल वॉनचे भाकीत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

सध्या आयपीएल स्पर्धेत युवा खेळाडू चमकदार कामगिरी करत आहेत. तसेच, काही युवा कर्णधारही आपल्यातील नेतृत्वगुण दाखवत आहेत. अशातच आता भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा त्याच्या क्रिकेट करिअरच्या शेवटच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे पुढील एक-दोन वर्षांमध्ये भारताला नव्या कर्णधाराचा शोध घ्यावा लागणार आहे.

सध्या भारतीय क्रिकेट संघात असे अनेक युवा खेळाडू आहेत ज्यांचे नाव भारताचा भावी कर्णधार म्हणून समोर येत आहे. अशातच आता इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉन याने भारताच्या भविष्यातील कर्णधाराबाबत स्पष्ट मत व्यक्त केले आहे.



वॉनच्या मते, गुजरात टायटन्सचा कर्णधार असलेला शुभमन गिल भारतीय संघाचा नवा कर्णधार असेल. मायकेल वॉनने सोशल मीडियावर आपले मत व्यक्त करताना लिहिले की, शुभमन गिल एक दिवस खूप चांगला कर्णधार बनेल. तो एक दिवस भारतीय संघाचा कर्णधार होईल यात शंका नाही.

# चेपॉकवर जडेजा शो

**। चेन्नइ । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२४ स्पर्धेतील २२ वा सामना चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स संघात खेळवला गेला. एमए चिदंबरम (चेपॉक) स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात रविंद्र जडेजाने त्याच्या क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजीने लक्ष वेधले.

या सामन्यात चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यान, कोलकाताकडून तुषारने आऊटसाईड ऑफला टाकलेल्या चेंडूवर सॉल्टने शॉट खेळण्याचा प्रयत्न केला, परंतु, बॅकवर्ड पॉंइटला असलेल्या जडेजाने सॉल्टचा सहज झेल घेतला. त्यामुळे पहिल्याच चेंडूवर चेन्नईला पहिली विकेट मिळाली. सातव्या षटकात चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने रविंद्र जडेजाच्या हातात चेंडू सोपवला आणि जडेजानेही कमाल केली. त्याने रघुवंशीला



या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर २४ धावांवर पायचीत केले. याच षटकात जडेजाने कोलकाताला आणखी एक धक्का दिला. त्याने आक्रमक खेळणाऱ्या नारायणला महिश तिक्षणाच्या हातून झेलबाद केले. नवव्या षटकात जडेजाने गोलंदाजी करताना धोकादायक वेंकटेश अय्यरलाही बाद केले.

जडेजाच्या गोलंदाजीमुळे कोलकाताच्या धावांच्या गतीला रोख लागला. त्यानंतर आलेले फलंदाज धावांसाठी संघर्ष करताना दिसले. जडेजाने शेवटच्या षटकात कोलकाताचा कर्णधार श्रेयस अय्यरचाही झेल घेतला. जडेजाने गोलंदाजी करताना त्याच्या ४ षटकांमध्ये अवघ्या १८ धावा देत ३ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या.

# विश्वचषकात कोहली असणे गरजेचे

**। बंगळूर । वृत्तसंस्था ।**

विराट कोहलीचा प्रभाव हा स्ट्राइक रेटपेक्षा मोठा आहे. त्यामुळे येत्या टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत तो भारतीय संघात असणे महत्त्वाचे आहे, असे मत वेस्ट इंडीजचा माजी महान फलंदाज ब्रायन लारा याने व्यक्त केले. या आयपीएलमध्येही सलामीला खेळत असलेला आणि यंदा पहिले शतक करण्याचा मान मिळवलेल्या विराट कोहलीचा अपेक्षेपेक्षा कमी असलेला स्ट्राईक रेट चर्चेचा विषय ठरलेला आहे. राजस्थानविरुद्ध त्याने केलेली ६७ चेंडूंतील शतकी खेळी ही आयपीलमधील संयुक्तपणे संथ खेळी ठरली. २००९ मध्ये मनीष पांडेने ६७ चेंडूत शतक केले होते.

सलामीवीर म्हणून खेळत असलेल्या कोहलीचा स्ट्राईक रेट १३० पर्यंत असतो, पण त्याची इनिंग संपता संपता तो १६० पर्यंत गेलेला असतो. त्यात टीका करण्यासारखे काही नाही, टी-२० विश्वकरंडक स्पर्धेसाठी रोहित शर्मा, शुभमन गिल आणि विराट कोहली असे भारतासाठी पहिले तीन फलंदाज असायला हवे, आयपीलमधील बंगळूर संघाबाबत बोलायचे तर विराट हा त्यांच्यासाठी एकखांबी तंबूसारखाच आहे, असे लारा म्हणाला.




# गुकेशची फॅबियानोलावर मात

## गुजराथीचा सलग दुसरा पराभव; आर. प्रज्ञानंद चौथ्या स्थानावर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश याने रविवारी (दि.७) मध्यरात्री झालेल्या लढतीत अव्वल मानांकित अमेरिकेच्या फॅबियानो कॅरुअनाला रोखले आहे. या दोन खेळाडूंमधील ही लढत ड्रॉ झाली. मात्र, भारताच्या विदित गुजराथी याला आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेतील चौथ्या फेरीत हार पत्करावी लागली. रशियाच्या इयान नेपोनियात्ची यांच्याकडून गुजराथीचा पराभव झाला.**



डी. गुकेश-फॅबियानो कॅरुअना यांच्यामधील लढतीत भारताच्या पठ्ठ्याने काळ्या मोहरांनी सुरुवात केली. लढतीच्या मध्यावर गुकेश दबावाखाली आला होता; पण दबावाखाली त्याने आपला खेळ बिथरू दिला नाही. कॅरुअनाला त्याने विजयापासून दूर ठेवले. अखेर ७४ चालींनंतर ही लढत ड्रॉ राहिली.

आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेत रशियाचा इयान नेपोनियात्ची याने दुसऱ्या विजयासह तीन गुणांनिशी पहिल्या स्थानावर झेप घेतली आहे. डी. गुकेश व फॅबियानो कॅरुअना हे २.५ गुणांसह अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत. आर. प्रज्ञानंद दोन गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. एलिरेझा फिरॉझा, निजात एबासोव, हिकारु नाकामुरा व विदित गुजराथी या चारही बुद्धिबळपटूंना १.५ गुणांची कमाई करता आली आहे.

### २४ चालींनंतर ड्रॉ

**आर. प्रज्ञानंद- हिकारु नाकामुरा यांच्यामधील लढत २४ चालींनंतरच ड्रॉ झाली. प्रज्ञानंद आपल्या अद्भूत खेळाच्या जोरावर सर्वांनाच प्रभावित करीत आहे. नाकामुराविरुद्धच्या लढतीतही त्याने आपली चमक दाखवली. प्रज्ञानंदविरुद्ध जोखीम न घेता नाकामुरा याने ड्रॉवर समाधान मानले.**

### हम्पीचा पराभव

**महिला विभागात भारताची अनुभवी खेळाडू कोनेरू हम्पी हिला धक्कादायक पराभवाला सामोरे जावे लागले. बल्गेरियाच्या नुरग्यूल सॅलीमोवा या युवा महिला खेळाडूने हम्पीवर मात करताना उल्लेखनीय खेळ केला. या पराभवामुळे हम्पी फक्त १.५ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. चीनची टॅन झोंगयी ही तीन गुणांसह महिला विभागात पहिल्या स्थानावर विराजमान आहे. भारताची आर. वैशाली दोन गुणांसह चौथ्या स्थानावर आहे.**

# बुमराहचे १५० बळी

**मुंबई :** दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध दोन विकेट घेत बुमराहने एक खास विक्रम आपल्या नावावर केला आहे. बुमराहने आयपीएलमध्ये १५० विकेट्स पूर्ण केल्या आहेत. अशी कामगिरी करणारा तो अकरावा खेळाडू बनला आहे. तसेच, बुमराहमध्ये तिसरा जलद १५० विकेट्स घेणारा खेळाडू बनला आहे. त्याने १२४ सामन्यांमध्ये ही कामगिरी केली.

या यादीत लसिथ मलिंगा पहिल्या क्रमांकावर आहे, त्याने १०५ सामन्यांमध्ये १५० विकेट्स घेतल्या होत्या. दुसऱ्या स्थानावर युजवेंद्र चहल असून त्याने ११८ सामन्यांमध्ये ही कामगिरी केली होती.

# सुमित नागलने रचला इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सुमित नागलने आज इतिहास रचला. तो क्ले कोर्टवरील एटीपी मास्टर्सच्या पुरूष एकेरीच्या पहिल्या फेरीत विजय मिळवणारा भारताचा पहिला टेनिसपटू ठरला. सुमिन नागलने मॉंटे कार्लो मास्टर्स स्पर्धेच्या मुख्य ड्रॉमधील पहिल्या सामन्यात जागतिक क्रमवारीत ३८ व्या स्थानावर असलेल्या माटिओ अर्नाल्डीचा पराभव केला.

नागलने एटीपी मास्टर्स १०००च्या या स्पर्धेत पात्रता फेरी पार करून मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश मिळवला होता. ४२ वर्षानंतर पुरूष एकेरीमध्ये भारताचा टेनिसपटू मुख्य ड्रॉमध्ये पोहचला होता. त्याने पहिल्या फेरीत इटलीच्या माटिओचा ५-७, ६-२, ६-४ असा पराभव केला. आता त्याचा दुसऱ्या फेरीतील सामना हा जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानावर असलेल्या होलगेर रुनेसोबत असणार आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)